
दैनिक सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी १९ जानेवारी २०२५

# मालगुंड परिसरातील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व! दादा केळकर !!

श्रीनिवास घैसास
वकील उच्च न्यायालय व
नोटरी भारत सरकार

**गुरुवारी सकाळी अगदी लवकर एक फोन वाजला आणि ध्यानीमनी नसताना दादा केळकर याच्या निधनाची दुःखद बातमी समजली.**

मी खूप अस्वस्थ झालो. नात्याने तो माझा मावस भाऊ खरा पण माझे आणि त्याचे एक वेगळेच नाते होते. आम्ही मित्राप्रमाणे गप्पा मारायचो. अनेक वेळा त्याने मला खूप मार्गदर्शन केलेले आहे. माझा जन्म हा त्यांच्याच घरातला तेव्हापासून त्यांच्या घराची माझे एक अतूट नाते आहे म्हणूनच दादाच्या निधनाची दुःखद बातमी समजली आणि सारा जिवन पट माझ्या डोळ्यासमोरून सरकू लागला.



**श्री. दादा केळकर**

बंडूशेठ उर्फ दादा केळकर हे मालगुंड परिसरातील एक बहुआयामी व्यक्तिमत्व ! गेले साठ वर्षे मी त्याच्या प्रवासाचा साक्षीदार आहे आणि एखादी व्यक्ती आपल्या कर्तुत्वावर कसे साम्राज्य निर्माण करू शकते आणि हे करत असताना एकत्र कुटुंब कसे चालवू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे दादा केळकर होय! तसं पाहायला गेलं तर केळकर घराणं एक खानदानी घराण, सुप्रतिष्ठित घराण, गणपतीपुळ्याच्या देवस्थानचे सरपंच पद देखील यांच्या घरात अनेक वर्ष होते. दादाचे वडील आणि त्यांचे भाऊ हे देखील कितीतरी वर्ष एकत्र राहत असत. तात्या म्हणजे दादाचे वडील आणि भाऊ म्हणजे दादाचे काका जणू काय राम लक्ष्मणच! एकत्र कुटुंब असण्याचा एक मुख्य तोटा म्हणजे कोणावरही एकावर जबाबदारी नसते सामायिक जबाबदारी मध्ये सर्व गोष्टी होऊन जातात परंतु तात्या व भाऊ वेगळे झाल्यानंतर दादांवर एक मोठी जबाबदारी येऊन पडली कारण घरातील सर्वात मोठा मुलगा तोच होता. तात्या त्या मनाने लवकर वारले होते. एकूण सर्व मिळून नऊ भावंडे आणि शेती आणि कलमे असली तरी तो एक सीजनचा व्यवसाय एवढे मोठे कुटुंब चालवायचे आणि ते सुद्धा योग्य रीतीने चालवायचे हे मोठे आव्हानच होते आणि दादाने ते लिलया पेलले.

वडिलोपार्जित दुकान चालवता चालवता त्याने पिठाची गिरण सुरू केली. तसेच आंब्याच्या पारंपारिक व्यवसायाबरोबरच हापूस आंब्याचा रस पॅक बंद करण्यासाठी कॅनिंग फॅक्टरी काढली. हळूहळू व्यवसाय वाढत होता. आपल्या सर्व भावांना एकत्र घेऊन त्याने अनेक नवीन उद्योग सुरू केले. त्यामध्ये त्याने अगदी कौलांच्या व्यापारापासून ते हॉटेल व्यवसायापर्यंत कुठलेही क्षेत्र सोडले नाही आणि त्यामध्ये यश देखील मिळवले. एखादी गोष्ट करताना अनेक गोष्टींचा तोल सांभाळावा लागतो दादाला त्याचा खूप अनुभव आला. घरातील दूध विकायचे नाही, घरात असणारे धार्मिक वातावरण तसेच ठेवायचे, सर्व भावंडांना एकत्र ठेवून सर्व कुटुंबाचा गाडा हाकायचा हे काही सोपे काम नव्हते. परंतु दादाने ते अगदी चोखपणे पार पाडले.

या कामी त्याला त्याच्या आईची म्हणजे माझ्या मावशीची खूपच मदत झाली. माझी मावशी गेल्या काही वर्षांपर्यंत हयात होती. सर्व कुटुंबाची जबाबदारी पेलतानाच त्याने अगदी नातेवाईकांची देखील जबाबदारी पार पडली. दादाच्या मावश्या या जवळपास त्याच्याच वयाच्या! शिक्षणापासून अगदी त्यांच्या बाळंतपणापर्यंत नातेवाईकांच्या सर्व जबाबदाऱ्या देखील केळकर कुटुंबाने अगदी चोखपणे पार पडल्या. त्यांच्या आईकडचे नातेवाईक वडिलांकडचे नातेवाईक अशा अनेक नातेवाईकांना या केळकर कुटुंबाने सावरले आहे, मदतीचा हात दिला आहे. त्यांच्या अडचणी काढल्या आहेत. हे सर्व करत असताना कोणीही कसलीही कुरकुर केलेली आम्हाला तरी आठवत नाही हाच त्या कुटुंबाचा मोठेपणा आहे, आणि हाच मोठेपणा अगदी जसाच्या तसा दादाने आजपर्यंत सांभाळला म्हणूनच मालगुंड मधील सर्वात मोठे एकत्र कुटुंब, यशस्वी कुटुंब,उद्योगी कुटुंब म्हणून त्यांचा दबदबा आहे.

आपले सख्खे भाऊ यांची मुले, त्या मुलांची मुले ही सर्वजण एकत्र राहत आहेत हेच दादाचे खूप मोठे यश आहे. आज-काल मुलगा आणि वडील सुद्धा एकत्र राहणे कठीण या ठिकाणी तीन तीन पिढ्या एकत्र राहत आहेत, गुण्या गोविंदाने नांदत आहेत हे खरोखरच या युगातील आश्चर्यच म्हणावे लागेल आणि हे दादाने कुटुंबप्रमुख म्हणून करून दाखवले असेच आपल्याला म्हणावे लागेल.या कौटुंबिक यशाबरोबरच दादाने अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली, राजकारणही केले. ग्रामपंचायत सदस्यत्व देखील अनेक वर्षे भूषवले. परंतु हे करत असताना कोणतीही कटूता त्याने आणली नाही. राजकारण करत असला तरी सर्वांशी त्यांचे संबंध अत्यंत सलोख्याचे आणि घरोब्याचे होते. त्यांच्याकडे अगदी लहान थोरापासून अगदी मोठ्यांपर्यंत राजकारणी लोकांपर्यंतची वर्दळ असे त्या सर्वांकडे दादा जातीने लक्ष देत असे. अगदी लहान मुलांपासून ते त्यांच्याहून वयाने मोठे असणाऱ्या सर्व व्यक्तींची त्याचे जमत असे. दादाबरोबर गप्पा मारणे याचा आनंद काही औरच असे हा आनंद मी कित्येक वेळेला घेतला आहे.

दादाला राजकारणापासून ते शेतीपर्यंत सर्व विषयातली जाण होती. अगदी हसत हसत तो समोरच्याला एखादी गोष्ट समजावून सांगत असे त्याची चूक असली तरी देखील दादा त्याला पटवून सांगायचा त्यामुळेच त्याचे सर्व घरातील, गावातील लोकांशी जमत असे. त्याचा एक आदर युक्त दरारा होता. त्याचा धाक असला तरी त्यामध्ये भीती नसायची. दादा प्रसंगी लवचिक तर प्रसंगी ताठर भूमिका देखील घ्यायचा परंतु एखाद्या प्रसंगा नंतर त्याची कटूता तो कधीच मागे ठेवत नसे.

दादाने अनेक क्षेत्रात भरीव अशी कामगिरी केली. गणपतीपुळे येथे पर्यटनाचे महत्त्व वाढू लागल्यावर त्याने त्या ठिकाणी स्वतःचे असे लॉजिंग बोर्डिंग सुरू केले आणि स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. मिळालेल्या संधीचे सोने कसे करायचे हे याचे उत्तम उदाहरण होते. हे करत असतानाच पारंपारिक रीतीने कॅनिंग फॅक्टरी चालवण्यापेक्षा ते आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेल्या नामांकनाप्रमाणे चालवणे हे त्यांचे स्वप्न होते त्याप्रमाणे त्यांनी फॅक्टरी ची देखील निर्मिती केली.

(**पान ३ वर** )

ज्येष्ठ विधितज्ञ **श्रीनिवास घैसास** हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते **जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती** याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.

# सकपाळ पप्पा



## मनाच्या हिंदोळ्यावर



**बाबू घाडीगांवकर,**
**त्रिंबक, ता.मालवण.**
**मो. ९४२१७९५९५५.**

आमच्या बालपणी आमच्या गावातच काय, पण संपूर्ण पंचक्रोशीत फक्त सकपाळ पप्पांची 'साऊंड सर्व्हिस' होती. 'साईकृपा साऊंड सर्व्हिस' असे त्यांच्या व्यवसायाचे नाव होते. पंचक्रोशीतील सार्वजनिक कार्यक्रम, लग्नसमारंभ, गोंधळ, नंद्याचे पडद्यावरचे सिनेमे अशा सर्वांसाठी सकपाळ पप्पांच्या साईकृपा साऊंड सर्व्हिसला पर्याय नव्हता. साधारण ऐंशीच्या दशकात पप्पा मुंबईतील सलून व्यवसाय बंद करून गावी आले असावेत. मुंबईच्या सलूनचा सगळा सेट पप्पांनी गावातल्या टेंबबाजारात उभा केला. दिवसभर ते सलूनमध्ये काम करीत. त्यांचा हात विलक्षण हलका होता आणि त्यांची कारागिरी हा अनेकांच्या आवडीचा विषय होता.

तेव्हाच्या काळात एखाद्या कार्यक्रमासाठी वा समारंभासाठी लाऊडस्पीकर हवा असल्यास थेट मालवण शहर गाठावे लागायचे. तसे मालवण शहरदेखील तेव्हा थेट नव्हतेच. कालावलीच्या खाडीतून बोटीचा प्रवास करून पलीकडे एसटी बससाठी हडी गावात जावे लागायचे. मात्र परिसरातील लोकांची अशी अडचण जाणून सकपाळ पप्पांनी त्यांची साईकृपा साऊंड सर्व्हिस सुरु केली. त्या काळात गाण्यांच्या तबकड्या मिळत. आज आपण ज्या सीडीज वापरतो तशाच पण आकाराने मोठ्या असत. एच एम व्ही, व्हिनस वगैरे कंपन्यांच्या अशा सीडीज त्या काळात लोकप्रिय होत्या. ती तबकडी हळुवार हाताने पुसून ती ग्रामोफोन नामक यंत्रात व्यवस्थित बसवावी लागे. ते यंत्र जपणे, तबकडी व्यवस्थित बसविणे म्हणजे तसे कारागिरीचे काम होते. पण पप्पांनी ते कसब अवगत केले होते. पप्पांची 'साईकृपा साऊंड सर्व्हिस' त्या काळात फार लोकप्रिय होती. श्री सत्यनारायण पूजा, बारसा, लग्न यांसारख्या समारंभांसाठी 'सूट' होणारी भावगीते, भक्तिगीते, लग्नगीते, जुनी हिंदी सिनेमागीते, लोकगीते वगैरेंचा फार मोठा 'स्टॉक' पप्पांच्या पेटीत उपलब्ध असायचा. पप्पांच्या साऊंड सर्व्हिसला संपूर्ण पंचक्रोशीत फार मोठी मागणी होती. पप्पा एखाद्या ऑर्डरसाठी कधी घासाघीस करीत नसत. एखाद्या गरीबाघरच्या बारश्यासाठी, लग्नसमारंभासाठी ते मोफतदेखील लाऊडस्पीकर लावीत. पप्पांना श्रीमंतांपेक्षा गरीबांबद्दल फार मोठी कणव होती. त्यांना गरीबांविषयी फार उमाळा होता.

पप्पा एक अभिजात व नैसर्गिक अभिनेते होते. त्यांना सिनेमांपेक्षा नाटकांची आवड होती. ते दरवर्षी शिवजयंतीनिमित्त गावातल्या तरुणांना गोळा करून ऐतिहासिक नाटक बसवीत. अर्थातच कोणतेही ऐतिहासिक नाटक बसवणे, सादर करणे हे सोपे काम नव्हतेच. मला आठवते, एका वर्षी 'रायगडाला जेव्हा जाग येते...' हे त्यांनी बसविलेले नाटक फार लोकप्रिय झाले होते. त्या नाटकातली त्यांची प्रमुख भूमिकादेखील अजरामर



पुर्वी वाहतुकीची साधने, डांबरी रस्ते वगैरे नसताना एका सायकलवरून साऊंड सिस्टीमचे सामान, त्यात ग्रामोफोनची पेटी, माईक, स्टॅन्ड, लांबलचक कर्णे(भोंगे), वायर्स, सीडीजची मोठी पिशवी वगैरे गावोगाव वाहून नेणे फार कष्टप्रद होते. मात्र पप्पांनी कधी अशा कामांचा कंटाळा केला नाही. साऊंड सर्व्हिस सोबतच ते विद्युत रोषणाईची कामेही करीत.

पुर्वीची विद्युत तोरणे 'चायनीज' नव्हती. एकदा विकत घेतलेल्या तोरणमाळा दहा पंधरा वर्षे तरी टिकत. अशी पाच ते सहा हजार दिवे असलेल्या तोरणमाळा पप्पांकडे होत्या. तितक्या तोरणांची सामग्री असल्याचा त्यांना अभिमान होता. एखाद्या मंदिरात, लग्नसमारंभात ते स्वतः मेडी उभारून, स्टूलावर चढून तोरणांच्या माळा लावीत. त्यांच्या साऊंड सर्व्हिस, लायटींगमुळे एखाद्या समारंभाचे सौंदर्य वाढले, खुलले की त्याना विलक्षण आनंद वाटे. मग यजमान देतील त्या बिदागीत ते समाधान मानीत.

पप्पांचे कुटुंब मोठे होते, आजदेखील ते मोठेच आहे. पप्पांना दोन भाऊ. त्यांपैकी सुरेंद्र अण्णा सकपाळ हे प्रसिद्ध खेळाडू व गुन्हा अन्वेषण विभागाचे सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी आहेत. आज तेदेखील सेवानिवृत्त असले तरी विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांवर ते कार्यरत आहेत. पप्पांना सामाजीक कार्याची फार मोठी आवड होती. छत्रपती शिवाजीमहाराज व शिर्डीचे साईबाबा ही पप्पांची आराध्य दैवते होती. गोरगरीबांच्या प्रत्येक दुःखद प्रसंगात पप्पा सर्वांच्या आधी धावून जात. त्यांच्या ठायी गरीब-श्रीमंत असा भेदभाव नव्हताच. अशाच सामाजीक कार्यातून पुढे जात पप्पांनी गावाचे सरपंचपद भूषविले. आपल्या सरपंच पदाच्या काळात पप्पांनी आदर्शवत कारभार केला. गावात विकासाच्या विविध योजना राबविल्या. शासनाच्या विविध योजनांचा तळागाळातील गोरगरीबांसाठी कसा लाभ देता येईल यासाठी जातीने लक्ष दिले. त्यांच्या काळात गावाचे नाव तहसील, जिल्ह्यापर्यंत गाजले. अगदी आजदेखील गावातील बुजुर्ग माणसे बोलून दाखवतात, सदैव गावाच्या विकासासाठी झटणारा, निरपेक्ष भावनेने काम करणारा पप्पांसारखा दुसरा सरपंच झाला नाही.

पप्पांना त्यांच्या तरुणपणात शिकारीचा छंद होता. त्या काळात शिकारीस बंदी नव्हती तेव्हा ते पंचक्रोशीतील नावाजलेले व पट्टीचे 'बरकंदार' होते. याशिवाय त्यांना नियमित वाचनाची फार आवड होती. गावातल्या सार्वजनिक वाचनालयातून ते दररोज पुस्तके आणीत. याशिवाय दररोज पाच ते सहा दैनिक वृत्तपत्रे त्यांच्या दुकानात, घरात येत. पेपरातले, दिवाळी अंकांतले माझे लेख, कथा वाचून ते माझे नेहमी कौतुक करीत. एखादा लेख आवडला की मुद्दाम फोन करीत.

पप्पांचे सध्याचे वय ब्याऐंशी होते. मात्र एक दमा किंवा श्वास घेतानाचा होणारा त्रास सोडला तर त्यांना इतर कसला आजार नव्हता. या आजाराला ते 'हावूळ' म्हणत. या वयात देखील ते दररोजचे वाचन डोळ्यांना चष्मा न लावता करीत. मधुमेह, उच्च रक्तदाबाचा तर त्यांना लवलेशही नव्हता. मात्र वृद्धापकाळातील थकवा, शारीरिक अशक्तपणामुळे ते सध्या घरातून सहसा बाहेर पडत नव्हते. गेल्याच आठवड्यात माझी गावी फेरी पडली तेव्हा मी त्यांच्या घरी गेलो होतो. तसाही मी गावाकडे गेल्यावर त्यांना भेटतोच. तेवढा त्यांचा आणि आमच्या घराण्याचा 'घरोबा' आहेच. गेल्या आठवड्यात देखील पप्पांनी माझ्याशी छान गप्पा मारल्या. माझ्या नवीन पुस्तकाबद्दल विचारले. त्यांचा बोलका व ताजातवाना चेहरा, तेजस्वी डोळे आणि अगदी सहजचे बोलणे यामुळे मनात विचारदेखील आला नसता की पप्पा आता काहीच दिवसांचे सोबती आहेत. पण परवा पप्पा गेल्याची, पप्पा निवर्तल्याची बातमी वाचली. पप्पा आज या जगात नाहीत यावर आजदेखील खरेतर विश्वास बसत नाही. पण एका हरहुन्नरी, हौशी, रसिक, कष्टकरी आणि सदैव गावासाठी झटणाऱ्या व्यक्तिला माझा गाव मुकला आहे असे मात्र आता यापुढे कायम वाटत राहील. खरेच, पप्पांसारखी माणसे सारखी सारखी जन्माला येत नाहीत. मात्र ती जेथे जन्म घेतात, तो गाव भाग्यवान म्हणायला हवा. खरेच, पप्पा तुम्ही ग्रेट होतात. नव्हे, तुम्ही ग्रेटच आहात



गाव सोडून आल्यावर काही ना काही कारणाने का होईना आपण कधी ना कधी गावी जातोच.एक दिवस, दोन दिवस,चार दिवस, आठ दिवस आपण जाऊन गावी राहतो.गावकुसाच्या आठवणी पुन्हा जाग्या करतो.पण परतीच्या प्रवासाला निघताना काही ना काही गोष्टी,वस्तू कळत नकळतपणे आपसुक गावाकडे राहून जातात. आपल्या त्या गोष्टी डोळ्यासमोर तरळत असतात.अमुक तमुक गोष्टी राहिल्या म्हणून खंत नसते.उलट त्या राहून गेलेल्या ऐवजाचे मला तरी याचे नेहमी अप्रूप वाटते.त्या गोष्टींचे सुख हे राहून गेल्या दुखापेक्षा मोठे असते.घरी किंवा कुणाकडे अशा छोट्या छोट्या वस्तू राहिल्या म्हणून एक एक आठवण उरात जपली जाते कायमची.

मग मी कधीतरी साधा चौकट घडी घातलेला खिशातला रूमाल माजघरच्या खिडकीवर सोडून येतो. मी फोन करून सांगायच्या आधीच आईने सांगितलेले असते की, कपाटात ठेवला आहे पुन्हा आलास की घे. आपल्याला हुरहूर असते पुन्हा गावी जाण्याची. आईच्या हाताचा स्पर्श झालेल्या रुमालाला पुन्हा अलगद खिशात ठेवण्याची.

कपडे धुवायला टाकताना दोन चार नाणी तशीच खिशात राहतात. दोन चार नोटा तशाच भिजल्या म्हणून मी कित्येकवेळा पडवीच्या ओट्यावर उन्हात सुकवत घातल्या असतील पण पुन्हा खिशात न ठेवता तशाच त्या दहावीसच्या नोटा, चिल्लर सोडून आलो आहे. त्याचे एवढे गम वाटत नाही. जाऊ दे ना. म्हणत ती कमी आपण त्यांना मनापासून बहाल करतो अगदी जीव ओवाळून टाकल्यासारखे. ते पैसे घेण्यापेक्षा सोडून आल्याचा आनंद कैक पटीने जास्त असतो. कारण आई वडिलांना पैसे देण्याइतपत आपण कमवत कुठे असतो? त्याचे प्रेम, आपुलकी त्यापेक्षा हजारोपटीने मोठी असते.

कुणाच्या ओटी, पडवीत सहज बसतो तेव्हा त्या घरातील वयस्कर व्यक्ती जवळ येते. तिचा खरखरीत हात आपल्या गालावरून फिरवून अलगद हाताने मुका घेते. डोक्याला बोटं लावून बोटं मोडते. चाख काढते. तो खरखरीत स्पर्श किती वेळा आंघोळ केली तरी जात नाही. पुन्हा ताजा होतो. नेहमी जाणवत राहतो. मी तो स्पर्श आपण आपल्यासोबत घेऊन येतो. बार बार तो क्षण आठवत राहतो. याला काय म्हणावं ते कळत नाही. माया, प्रेम की अजून काही?

गावात हिंडताना जरी चप्पल घातली असेल तरी पायाला माती लागते. कधी मुद्दामहून अनवाणी चालतो. पायाला माती लावून घेतो. बालपणी त्याच मातीत खेळलो होतो याची आठवण येते, तेव्हा मात्र पायाला खडे टोचत नाहीत. त्या मातीचा राप, लेप काढताना, पाय घासताना पायवाट, अंगण, सडा सारवण आठवत राहतो. मनात सारं काही अजूनही घर करून आहे याची पोचपावती मिळते. मन मुक्कामी पुन्हा राहून येते.

आईने, आजीने, मावशीने, मला जे आवडतं ते त्यांच्या हाताने बनवून मोठ्या प्रेमाने कित्येकवेळा खाऊ घातले आहे. त्याची चव जिभेवर सदा रेंगाळत असते. मग साधी काप केलेली बटाट्याची लाल भाजी असू देत किंवा कांदा टोमॅटो घालून तव्यावर परतून केलेला जवळा असू देत.त्या पदार्थाच्या चवीची सर महागड्या हॉटेलमधे सुद्धा येणारनाही. मग सकाळी चहा सोबत बनवलेले घावने असोत, वडे, सागोती असो, काजूची भाजी, किंवा अन्य काही. गावी गेल्यावर खाण्यापिण्यात कसलीही कमी पडू देत नाहीत. ते हात,तो गोडवा रोज आठवत राहतो.



## मन मुक्कामी
## गावाकडच्याआठवणी



भावेश लोंढे,
दापोली
मोबा. ९७६९३८६०९१

मी गावी आलो आहे म्हणून घाईघाईत आपली मोठी बहीण, भाऊ, एखादा लहानपणीचा मित्र भेटायला आला असेल आणि आपण घरी नसणार म्हणून न भेटता ती व्यक्ती निघून गेली असेल ती हुरहूर मनाला कायम सलत आली आहे. असाच एक शाळेतील वर्ग मित्र दहावी सोडल्यानंतर काही वर्षाने भेटायला घरी आला मात्र मी नेमका भेटलो नाही. तोही बऱ्याच वर्षाने बाहेगावाहून आला होता. मग मी दुसऱ्या दिवशी त्याच्या घरी गेलो तर तो दुबईला निघून गेला होता. शेवटी भेट झालीच नाही. तेव्हा मात्र डोळ्यात पाणी आले.

हे बंध, हे नाते एक दुसऱ्यांकडे ओढत असते. जिथे जिव्हाळा असतो..मग आपणच आपल्यावर नाराज झालो. त्या मित्राला कायम मनात जपत आलो. गेल्याच वर्षी भेट झाली तेव्हा मन मात्र हरखून गेलं. गावी जाताना कधी घरातील प्रियजनांना एखादा शर्ट, टीशर्ट, घड्याळ किंवा त्याच्या आवडीची एखादी वस्तू घेऊन गेलो तर आपण देताना अन् तो घेताना दोघांचेही थरथरणारे हात एकमेकांसमोर पुढे असतात. तेव्हा मिठी शिवाय पर्याय नसतो. कित्येक सोसलेले घाव आठवत राहतात. पुढे बोलताना कातर झालेला स्वर सदैव मनात रुंजी घालत असतो.

माझ्याजवळ शेजारचा एखादे काठी टेकत आजोबा येतात. विचारपूस करू लागतात. बोलता बोलता त्याची ठरलेली खूण करतात मग मी दहा, वीस,पन्नासची नोट हळूच काढून माझ्या मुठीतून त्यांच्या मुठीत देतो. तेव्हा त्याचे बोबडे बोल ऐकत बसावे असेच असतात. त्यांच्या चेहऱ्यावर झालेला विलक्षण आनंद आपल्याला समाधान देऊन जातो.

अशा अनेक गोष्टी माझ्या बाबतीत घडल्या आहेत.आई बाबा गावी राहत आहेत. त्यामुळे जेव्हा गावी जातो तेव्हा त्यांच्याहून आनंद कुणालाच होत नाही एवढे मात्र खरे. मलाही तितकाच आनंद होतो. पण परतीच्या प्रवासाला निघताना काही ना काही गोष्टी कळत नकळतपणे,आपसुक मागे राहून जातात. आपल्या त्या गोष्टी डोळ्यासमोर येत असतात. राहून गेलेल्या या गोष्टींचे दुःख नाही वाटत उलट नेहमी अप्रूप वाटते. मनाच्या कोंदणात सदैव जपल्या जातात.

### मालगुंड परिसरातील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व!

# दादा केळकर !!

(पान १ वरून)

शैक्षणिक क्षेत्रात देखील त्यांचा महत्त्वाचा सहभाग असे. तो मालगुंड एज्युकेशन सोसायटीच्या कमिटीवर देखील अनेक वर्ष कार्यरत होता. तो रत्नागिरी कृषी उत्पन्न बाजार समितीचा देखील सदस्य होता. त्याने कुठलेही क्षेत्र असे सोडले नाही की जेथे त्याने आपला ठसा उमटवला नाही. अनेक मोठ्या लोकांशी त्यांचे चांगले संबंध होते. रत्नागिरीचे अनेक वर्ष नगराध्यक्ष असणारे डॉक्टर जगन्नाथ शंकर केळकर उर्फ डॉक्टर केळकर हे त्याचे चुलत बंधू होत. दादा अगदी सर्वसामान्य माणसांच्या आणि सर्व नातेवाईक यांच्या सर्व सुखदुःखात सामील व्हायचा. त्यामुळेच मालगुंड पंचक्रोशीत त्याला सर्वजण ओळखत असत. व्यवहारिक दृष्ट्या त्यांचे शिक्षण खूप नसले तरी जगाच्या अनुभवाच्या शाळेत तो बरेच काय काय शिकला होता, आणि त्या अनुभवाच्या जोरावरच त्याने सुरू केलेले सर्व उद्योग व्यवसाय हे यशस्वी ठरले आणि म्हणूनच आज केळकर कॅनिंगचा गवगवा सर्व दूर पसरला आहे. त्याने शेती व्यवसायात देखील भरपूर यश मिळवले आंबे उत्पादनात तो अग्रेसर होता. मालगुंड परिसराच्या विकासाचा त्याला ध्यास होता. थोडक्यात सांगायचे झाले तर मालगुंड पंचक्रोशीत त्याची भूमिका ही आंब्याच्या टाळ्या सारखी असे.

गेली काही वर्षे तो आजारी होता त्याच्या अन्ननलिकेचे ऑपरेशन देखील झाले होते त्यावर देखील त्याने जिद्दीने मात केली होती. शारीरिक व्याधी असून देखील तो सर्व व्यवहार पाहत होता या सर्वाला त्याच्या पत्नीची देखील उत्तम साथ मिळाली. मी तिला पुष्पाताई म्हणतो कारण ती लग्नाच्या अगोदर पासून, शाळेपासून ओळखीची होती. एका यशस्वी पुरुषाच्या मागे जशी एखादी खंबीर स्त्री उभी असते त्याप्रमाणेच आमची पुष्पाताई देखील त्याच्यामागे खंबीरपणे उभी होती. अगदी आत्तापर्यंत माझी मावशी हयात होती तिच्या हाताखाली ती खूप काही शिकली आणि एकीकडे सून आणि एकीकडे सासूबाई अशी काहीशी विचित्र भूमिका तिने अगदी सार्थपणे पार पाडली दादाच्या यशात तिचा नक्कीच महत्त्वाचा वाटा आहे आणि म्हणूनच मी या ठिकाणी त्याचा मुद्दाम उल्लेख केला आहे.

मालगुंड सारख्या ग्रामीण भागात राहून रडत राहण्यापेक्षा आहेत त्या संधी मधून व्यवसाय उद्योग उभारून आपण परिस्थितीवर कशी मात करू शकतो त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे माझा दादा आहे नाहीतर कोकणातील जवळपास सर्वजण नोकरी धंद्यासाठी मुंबई पुण्याकडे धावतात परंतु इथे राहून सुद्धा चांगल्यापैकी व्यवसाय उद्योग करता येतो हे दादाने दाखवून दिले एवढेच नव्हे तर आपल्या सर्व कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पडल्या सर्व मुलांना शिक्षण दिले आणि व्यवसायांची एक वाट दाखवून दिली हे त्याचे खूप मोठे कार्य म्हणावे लागेल.

**अशा या माझ्या सुस्वाभावी, मनमिळावू दादाच्या निधनाने केळकर कुटुंबीयांप्रमाणेच आमचा देखील एक आधारस्तंभ गेल्याचे दुःख आम्हा सर्वांना आहे. आम्हा सर्वांना तो गेल्यामुळे खूप मोठी पोकळी जाणवत आहे. परंतु काळापुढे इलाज नाही हेच खरे, आई महालक्ष्मी त्याला सदगती देवो हीच तिचे चरणी प्रार्थना. इती विज्ञापना ! आणि लेखन सीमा !!**

# कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी- भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.



## भाग -१
## जमिनीसंबंधी महत्त्वाचे उतारे

**ज्येष्ठ विधिज्ञ श्रीनिवास घैसास हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.**

१) **जमिनीचा ७/१२ चा उतारा जमिनीचा उतारा हे एक महत्त्वाचे कागदपत्र असते. या ७/१२ च्या उताऱ्यावरून आपणाला जमिनीसंबंधाने अनेक गोष्टी समजतात. त्या गोष्टी पुढीलप्रमाणे-**

अ) जमिनीची मालकी कुणाच्या नावावर आहे हे ७/१२ चा उतारा पाहिल्यावर आपणाला तात्काळ समजू शकते.

ब) ७/१२ च्या उताऱ्यावरील गोलातील आकड्यांच्या क्रमांकावरून ही मालकी ७/१२ वर कशी आली याची माहिती आपण काढू शकतो.

क) ७/१२ च्या उताऱ्यात मालकाव्यतिरिक्त अन्य कुणाचे हक्क आहेत किंवा कसे याची माहिती आपणाला होते.

१) जमिनीला कुणाचे कूळ लागले आहे काय?
२) जमिनीवर कसला बोजा आहे काय ?
३) सरकारी अथवा एखाद्या वित्तसंस्थेचे कर्ज व बोजा या जमिनीवर आहे किंवा काय?
४) दान, पोटगी, गहाण अशा प्रकारचा अथवा सरकारी कर्ज, बँकेचे कर्ज, सबसिडी अशा प्रकारचा कोणता बोजा जमिनीवर आहे काय?
५) कूळ असल्यास कोणत्या प्रकारचे कूळ आहे? संरक्षित कूळ आहे किंवा कसे? इत्यादी.

ड) ७/१२ च्या उताऱ्यावरून आणखी काही महत्त्वाच्या गोष्टी आपणाला कळू शकतात त्या पुढीलप्रमाणे-
१) जमिनीचा भूमापन क्रमांक, २) जमिनीचा हिस्सा क्रमांक, ३) जमिनीचे स्थानिक नाव, ४) जमिनीचा सारा, ५) जमिनीचे क्षेत्रफळ इत्यादी.

**७/१२ च्या उताऱ्यापासून आणखी काही महत्त्वाची माहिती मिळते ती पुढीलप्रमाणे-**

1. ७/१२ च्या उताऱ्यात पोटखराबा म्हणून प्रकार दाखवलेला असतो. पोटखराबा दोन प्रकारचा असतो. त्यात पोटखराबा 'अ'मध्ये नोंद केलेले क्षेत्र हे लागवडीसाठी योग्य धरले जात नाही. म्हणजेच या क्षेत्रफळात नैसर्गिक नाला, नदी, खडकाळ भाग, खंदक इ. गोष्टी येतात. थोडक्यात पोटखराबा 'अ' मधील क्षेत्र हे शेतीसाठी वापरण्यास योग्य नसलेले असे क्षेत्र असते. मात्र हे क्षेत्रफळ नैसर्गिक कारणामुळे शेतीसाठी वापरता येत नाही असे असते.
2. ७/१२ च्या उताऱ्यात पोटखराबा 'ब'मध्ये दाखवलेले क्षेत्रदेखील लागवडीयोग्य नसते. मात्र त्याचे कारण नैसर्गिक नसून मानवनिर्मित असते. म्हणजे यामध्ये दाखवलेले क्षेत्र हे सार्वजनिक रस्ते, कालवे आदी क्षेत्रांसाठी राखून ठेवलेले असते. या क्षेत्राचादेखील शेतीसाठी उपयोग होत नाही.

वर दर्शविलेली ही सर्व माहिती ७/१२ उताऱ्याच्या पहिल्या भागात / पानावर असते. खरे तर सात व बारा असे हे दोन उतारे असतात. ते दोन उतारे एकत्र केल्यामुळे त्याला '७/१२ चा उतारा' असे म्हणतात. यातील दुसऱ्या भागात / दुसऱ्या पानावर पीकपाण्याचे वर्णन असते. त्यावरून या जमिनीत कुठल्या प्रकारचे पीक घेतले जाते? जमिनीला पाणीपुरवठ्याची / सिंचनाची काही सोय आहे काय, याची माहिती असते. तसेच त्या जमिनीत जर कुठलेही पीक येत नसेल तर त्या जमिनीत दुसरी काही फळे देणारी झाडे आहेत का, उदा. आंब्याची कलमे, काजू इत्यादी काही झाडे असतील तर त्याची नोंददेखील या भागात असते. त्यामधीलही काही झाडे नसतील, नुसते गवतच असेल वा जमीन नुसती पडीक असेल तर किंवा गुरे चरण्यासाठी तिचा उपयोग होत असल्यास तिची गुरचरण/गायरान अशी नोंद त्या भागामध्ये केलेली असते.

- ७/१२ च्या उताऱ्यात काही नोंदी या शाईने केलेल्या नसून पेन्सिलने केलेल्या असतात. साधारणपणे पेन्सिलने लिहिलेल्या नोंदी या मंजूर झालेल्या नोंदी नसतात
- मात्र अशा नोंदी मंजूर झालेल्या नाहीत अशा प्रकारचा शेरा तलाठ्याने लिहावयाचा असतो. वर पाहिलेली सर्व, माहिती आपल्याला ७/१२ च्या उताऱ्यावरून मिळते.

**यानंतर आपण पुढील उर्वरित कागदपत्रांची माहिती करून घेऊया.**

२) गाव नमुना सहा 'अ' या दप्तरात किंवा दस्तऐवजात ज्या प्रकरणावरून वाद-विवाद उत्पन्न झालेले असतात अशा प्रकरणाची ही नोंदवही असते. यामधील नोंद मंजूर उत्तरवली जाते. झाली की ती ७/१२ च्या उताऱ्यावर

३) गाव नमुना सहा 'ब' या नोंदवहीत कलम १५२ प्रमाणे दंडवही असते. यामध्ये हक्कबदलाच्या अनुषंगाने येणाऱ्या (कलम १५२) प्रकरणांची नोंद असते.

४) गाव नमुना सहा 'क' हक्कांच्या नोंदी असतात. एखाद्या या दप्तरात किंवा उताऱ्यात वारसांच्या मालमत्तेला दप्तरी दाखल असे किती लोक वारस आहेत वगैरे सर्वांचे ज्ञान त्या वही रेकॉर्डमार्फत होते.

५) गाव नमुना सहा 'ड' यामध्ये जमिनीतील जे नव्याने पोटहिस्से पाडले जातात त्याच्या सर्व नोंदी या दप्तरातील रेकॉर्डमध्ये येतात.

थोडक्यात बोलायचे झाले तर जमिनीच्या अनुषंगाने ७/१२ व गाव नमुना ६ 'अ', 'ब', 'क', 'ड' ही दोन महत्त्वाची दप्तरे (रेकॉर्डस) आहेत. ७/१२ हे गाव नमुना ६ चे प्रतिबिंब असते (मालकी हक्कांच्या बाबतीत) असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये. एवढेच काय, गाव नमुना सहाबद्दल आपणाला असे म्हणता येईल की गाव नमुना सहा व त्याचे सर्व भाग ही म्हणजे जणू काही जमिनीची दैनंदिनीच होय. रोज घडणाऱ्या घटना जशा दैनंदिनीमध्ये नोंदवल्या जातात, तद्वतच जमिनीच्या अनुषंगाने मालकी हक्काचे पोटहिश्श्यात होणारे बदल हे या दप्तरात नोंदवले जातात. ही प्रक्रिया कधीही पुरी न होणारी असते. ती सातत्याने चालूच राहते.

६) गाव नमुना आठ हे दप्तरदेखील एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. यामध्ये एका गावात एका व्यक्तीच्या नावावर किती जमीन आहे हे समजू शकते. त्यामुळे एखाद्या शेतकऱ्याला आपल्या नावावर किती जमीन आहे हे समजते. तसेच एखाद्या जमीन विकत घेणाऱ्या व्यक्तीला आपण सदर जमीन विकत घेऊन त्याला भूमिहीन तर करत नाही ना, याचे ज्ञान होते. त्यामुळेच हा उतारा महत्त्वाचा ठरतो.

आता यानंतर आपले जमिनीसंबंधाने सर्व हक्क सुरक्षित आहेत ना, यावर जातीने लक्ष ठेवले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने दरवर्षी किमान एकदा तरी तलाठ्याकडून ७/१२ चा उतारा घेतला पाहिजे व या सर्व नोंदी जशाच्या तशा तपासल्या पाहिजेत. म्हणजे त्याला आपल्याजमिनीला कूळ लागले नाही ना? आपल्या जमिनीचा मालकी हक्क तर बदललेला नाही ना? आपल्या जमिनीवर अन्य गहाण, कब्जा वगैरे करून बोजा दाखविलेला नाही ना, याचे ज्ञान होते व तसे काही झाले असल्यास त्यासाठी आवश्यक ती प्रतिबंधात्मक कारवाई तो करू शकतो.

सर्वसामान्य माणसाला जमिनीविषयक कायदेशीर माहिती काय असे विचारले तर तो ७/१२ चा उतारा असेच उत्तर देईल. याचे कारण असे की, गाव नमुना सात/बारा या उताऱ्याव्यतिरिक्त त्याचा जमिनीच्या अन्य उताऱ्यांशी, नोंदींशी संबंध आलेला नसतो आणि पुष्कळशी कामे ही सात बाराचा उतारा असला की होऊनदेखील जातात. त्यामुळे तो इतर उतारे/नोंदी याविषयी फारसा उत्सुकही नसतो. असा हा जमिनीच्या संदर्भात महत्त्वाचा असणारा उतारा सात बारा हा कसा असतो आणि त्यामध्ये काय गफलत होण्याची शक्यता असते ते आपण सविस्तर पाहूया.

गाव नमुना सात/बारा हा जमिनीचा एक प्रकारे आरसाच असतो. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ प्रमाणे गाव नमुना सहामध्ये हक्क फेरफार नोंदी कशा होतात, त्यात गफलती होण्याचा संभव कसा असतो हे आपण यानंतर पाहणार आहोत. तत्पूर्वी अशा ह्या फेरफार हक्क नोंदणी गाव नमुना सहामध्ये झाल्यावर व त्या मंजूर झाल्यावर त्याचे प्रतिबिंब गाव नमुना सात बाराच्या उताऱ्यात पडते. गाव नमुना सात बारा, हे हक्क नोंद आणि पीक पाहणी पत्रक अशा स्वरूपात असते. नोंदवहीतील फेरफार नोंदींची जंत्री असते.

**(क्रमश :)**

**हिंदू धर्म हा संस्कारप्रधान धर्म आहे. संस्कार हा धर्माचा आत्मा आहे असे म्हटल्यास अनुचित होणार नाही.**



## जीवनातील १६ संस्कार (भाग -१)

**अध्यात्म**



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

चांगले करण्यास शिकवणे म्हणजे संस्कार असे ढोबळमानाने जरी म्हटले तरी त्यातून संस्काराची तितकीशी पूर्ण व्याख्या होत नाही. माणसाच्या अंगी असलेले दोष नाहीसे करून टाकून त्यांच्या जागी गुण निर्माण करणे आणि त्या गुणांची योग्य गोष्टीशी जोड साधणे म्हणजे संस्कार. (संस्काराची याहीपेक्षा उत्तम व्याख्या असू शकते यात वाद नाही हे मी येथे विनम्रपणे उल्लेखित करतो.) या संस्कारामुळे गुणाला तेज मिळून तो उजळतो. लक्षणीय ठरतो. हिरा जमिनीतून काढता तो मातमळ असतो. मलीन, निस्तेज असतो. त्याला साफ करून पैलू पाडले की तो उजळतो. या उजळलेल्या हिऱ्याला सोन्या चांदीच्या दागिन्यात मढविले की तो लक्षणीय, आकर्षक ठरतो आणि अनमोल होतो. अर्थात हिऱ्यावर होणाऱ्या कृती व त्यानंतर त्याची दागिन्याशी साधलेली जोड मिळून एकूण हिऱ्यावरील संस्कार कर्म झाले. या संस्काराने हिऱ्याला उच्चतम स्थान देऊन लक्षणीय केले. हे हिऱ्यावरील संस्कार कर्माचे फलित!

जन्माला येणारे अपत्य हे सुसंस्कारित असावे, आरोग्यसंपन्न असावे, उत्तम व्यक्तिमत्त्वाचे असावे, हुशार असावे, बहुगुणवंत असावे, प्रज्ञावंत असावे, प्रतिभावंत असावे, प्रबोधवंत असावे, धार्मिक वृत्तीचे असावे, सद्गुणी असावे, त्याची विचारसरणी उच्च असावी, ते कर्तृत्ववान असावे .... वगैरे अपेक्षा मातां-पित्यांच्या असतात. धार्मिक आणि आध्यात्मिक साहित्यात या अपेक्षांच्या साध्यतेसाठी त्रिकालज्ञानी ऋषीमुनींनी तसेच समाजधुरिण विद्वानांनी मानवाच्या जीवनात प्रामुख्याने १६ संस्कार (षोडश संस्कार) करण्याविषयी सुचविले आहे.

या १६ संस्कारांचा अंमल जन्मापूर्वीपासूनच जीवाच्या जडणघडणीवर, उपजणाऱ्या संततीच्या मनावर आत्म्यावर आणि देहावर व्हावा या अपेक्षेने या १६ संस्कारांची रचना केलेली दिसून येते. हे १६ संस्कार आणि इतरही काही संस्कार आहेत जे मानवी जीवनाला अधिकतम उच्च स्थितीला पोहोचविणारे आहेत असा आर्यांचा दृढ विश्वास होता. प्राचीन वा पूर्वापार शिक्षणातून या संस्कारांचा प्रचार, आचार होता मात्र अलीकडच्या शिक्षणातून त्याचे निर्मूलन होताना दिसत




आहे ही खेदाची बाब आहे. अपत्याबाबत जन्मापूर्वीपासून ते जन्माला आल्यानंतरही आईबापांच्या अपेक्षा या आजही तशाच आहेत परंतु संस्कारांचे विस्मरण पडत चालले आहे. संस्कारांचा ऱ्हास होत चालला आहे. संस्कारांचे मार्ग बदलत जाऊन हे बदलते मार्ग या अपेक्षांची उपेक्षा करीत असल्याचे प्रचितीस येऊ लागले आहे हे असे वर्तमान काळात सर्रास होत आहे. वर्तमानपत्र उघडून वाचले की रोजच याचे पुरावे मिळतात. शिक्षण पद्धतीत ' मानवी उद्धाराचा केंद्रबिंदू ' नजरेसमोर ठेवून अंतर्भूत करावयाच्या ज्या ज्या बाबी आहेत त्यापैकी १६ संस्कार ही एक प्राधान्याची बाब असायला हवी. षोडश संस्कारांवर अनेक पुस्तके, ग्रंथ रचले गेले आहेत. अलीकडेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या एका परिपत्रकाद्वारे १ ते १५ जानेवारी यादरम्यान महाराष्ट्र राज्यातील शासकीय व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातून ' वाचन संकल्प महाराष्ट्राचा ' हा कार्यक्रम राबविण्याबाबत जाहीर करण्यात आले होते. आपल्याकडे ' वाचन प्रेरणा दिन ' देखील साजरा करण्यात येतो. प्रश्न असा आहे की, ' नेमके काय वाचावे? ' मला उत्तर सुचते ते असे की, ' जीवनाच्या मूल्यांचे अध:पतन वाचवणारे आणि जीवन कृतार्थ, यथार्थ करणारे जे काही वाचनीय आहे ते प्राधान्याने वाचावे.' जीवनाधिष्ठित मूल्यांचा ऱ्हास थांबवून त्या मूल्यांचा अभ्युदय घडविणारे जे ज्ञान आहे ते वाचून आत्मसात करावे. जगातील श्रीमंत माणूस कोण आहे, एखाद्या राज्याची राजधानी कोणती आहे, जगातले नवे आश्चर्य कोणते... वगैरे ज्ञान मिळवणे हे दुय्यम असावे. आपले स्वत्व, अध्यात्म व त्याचा विश्वाशी असणारा मुलाधार संबंध याचे ज्ञान हे प्रधान्याने असणे आवश्यक आहे. मानवी जीवनाचे परम उद्दिष्ट काय आहे हा महत्त्वाचा प्रश्न आणि त्याचे उत्तर सांगणारे, हे उद्दिष्ट साधण्यासाठी आवश्यक अर्हता, पात्रता साधण्यासाठी आवश्यक असणारे संस्कार घडविणारे ज्ञान पाठ्यपुस्तकात ठसठशीत असणे हे आवश्यक आहे. असो.

बालकाच्या जन्माच्या आधीपासून किंबहुना गर्भधारणेच्या आधीपासून ते जन्मानंतर मृत्यूपर्यंत मानवाच्या उत्कर्ष आणि उद्धारासाठी प्रामुख्याने सोळा संस्कारांची उपयोजकता सांगितलेली आहे. हे १६ संस्कार अनुक्रमे पुढील प्रमाणे आहेत.

१) गर्भाधान, २) पुंसवन,३) सीमंतोनयन,४) जातकर्म,५) नामकरण, ६) निष्क्रमण, ७) अन्नप्राशन,८) चौलकर्म, ९) उपनयन,१०) महानाम्नी व्रत, ११) महाव्रत,१२) उपनिषद व्रत,१३) गोदान व्रत, १४) केशांत,१५) समावर्तन व १६) विवाह

याशिवाय ' अंत्येष्टी ' हा मृत्यूनंतरचा संस्कार सांगितलेला आहे. या अंत्येष्टी संस्कारामागे देह आणि मन यांना त्यागलेल्या आत्म्याला मोक्ष प्राप्त व्हावा आणि एकूण मनुष्य जीवनाचे सार्थक व्हावे हा उद्देश आहे.

**(उर्वरित पुढील भागात)**

# मकरसंक्रांती आणि तिळगुळाचे आयुर्वेदिक महत्त्व

मकरसंक्रांतीचा सण तिळगुळाशिवाय अपूर्ण आहे. आयुर्वेदानुसार तिळगुळाला फक्त चवदार पदार्थ मानले जात नाही, तर ते आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर आहे. या सणाच्या वेळेस हिवाळ्याची तीव्रता असते, आणि यावेळी शरीराला उष्णता आणि पोषणाची गरज असते. तिळगुळाचे सेवन यासाठी उपयुक्त ठरते.

**तिळाचे महत्त्व:**

आयुर्वेदानुसार तीळ उष्ण गुणधर्माचा असून शरीरातील वात आणि कफ दोष कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. तीळ शरीरातील उष्णता टिकवून ठेवतो आणि सांधेदुखी तसेच थंडीमुळे होणाऱ्या त्रासापासून संरक्षण करतो. तीळ कॅल्शियम, मॅग्नेशियम, आणि झिंकसारख्या पोषणमूल्यांनी समृद्ध आहे, जे हाडांच्या मजबुतीसाठी उपयुक्त आहेत.

**गुळाचे फायदे:**

गुळ रक्त शुद्धीकरणासाठी आणि पचनक्रिया सुधारण्यासाठी प्रसिद्ध आहे. तो शरीरातील उष्णता वाढवतो आणि शरीराला थंडीत उष्णतेचा आधार मिळवून देतो. गुळातील लोह (आयरन) रक्तहिनतेसाठी उपयुक्त आहे आणि थंडीच्या दिवसांत शरीराची ऊर्जा टिकवून ठेवतो.

**तिळगुळ एकत्र का खातात?**

तिळगुळाचा मिलाफ वात, पित्त, आणि कफ दोष संतुलित करण्यासाठी मदत करतो. हिवाळ्यात गोड पदार्थ सेवन केल्याने शरीराला उष्णता मिळते, तर तीळ पोषण पुरवतो.

**सणाच्या परंपरेतील आरोग्य:**

मकरसंक्रांतीच्या काळात सूर्याच्या उष्णतेत बदल होतो, ज्यामुळे शरीराला अधिक ऊर्जा लागते. तिळगुळाचे सेवन हाच ऊर्जेचा नैसर्गिक स्त्रोत आहे. त्यामुळे "तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला" ही परंपरा आरोग्याला लाभदायक ठरते.

# सरकारी योजना/नोकरी

## स्वामित्व योजना

**खेड्यापाड्यातील लाखो नागरिकांच्या जमिनींचे वादविवाद आजही सुरु असून त्यांना त्यांच्या जमिनीविषयी पक्की माहिती नसते. स्वतःच्या घराची कागदपत्रे त्यांच्याकडे नसतात, जमिनीच्या सीमा माहिती नसतात. त्यामुळे कळत नकळत त्यावर कब्जा केला जातो. कोर्टकचेऱ्यांमध्ये हेलपाटे मारताना पिढ्यानपिढ्या खर्ची पडतात. वकिलांची फी, कोर्टाचे खेटे यात अनेक कुटुंबे अक्षरशः रडकुंडीला येतात. कितीतरी दावे आजही कोर्टात पडून आहेत. अशा परिस्थितीत लोकांचा वेळ, श्रम आणि पैशाचा अपव्यय होतो. देशातल्या अशा करोडो लोकांना चिंतामुक्त करण्यासाठीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वामित्व योजना आणली. ही फक्त एक सरकारी योजना नाही तर ग्रामविकासाची चळवळ आहे.**

स्वामित्व योजनेंतर्गत गावठाण भूमापन सनद वितरण कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे संपन्न झाला. या अनुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि स्वामित्व योजनेच्या लाभार्थ्यांच्या उपस्थितीत ठाणे जिल्ह्यातील गावठाण भूमापन सनद वितरण कार्यक्रम येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आज संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि.24 एप्रिल 2020 रोजी स्वामित्व योजनेचे उद्घाटन केले होते. या योजनेचा उद्देश गावातील आबादी क्षेत्रातील घरांसाठी सनद व मालमत्ता पत्रक देणे, हा आहे. यासाठी ड्रोन तंत्रज्ञान आणि प्रगत नकाशांकन तंत्राचा उपयोग केला जातो. ही योजना ग्रामीण समुदायांच्या आर्थिक समावेशनात सुधारणा, पतपुरवठ्यास सुलभता आणि एकूणच सामाजिक-आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

स्वामित्व योजनेचे लाभ सर्वात महत्वाच्या व शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील अधिनस्त असलेले तालुका ठाणे, कल्याण, शहापूर, भिवंडी, अंबरनाथ मधील एकूण 43 गावात स्वामित्व योजनेंतर्गत सनद वाटपाचे कार्यक्रम संबधित गावांमध्येही आयोजित करण्यात आले होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गरिबांच्या कल्याणाचा ध्यास घेतलेले देशाचे लोकप्रिय आणि यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या स्वामित्व योजनेच्या या सोहळ्याला आपण सर्वजण उपस्थित आहोत. जिल्ह्यातील लाभार्थ्यांना प्रॉपर्टी कार्डचे वितरणही करण्यात आले आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या आयुष्यात सुखाचे आणि चिंतामुक्त दिवस आले आहेत.

भारताचा आत्मा गावात आहे, असे आपण नेहमी म्हणतो. परंतू, दुर्दैवाने ग्रामीण भाग काहीसा दुर्लक्षित राहतो. परंतु, 2014 नंतर परिस्थिती बदलली आहे. ग्रामीण भागाची 'आर्थिक प्रगती' करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या 10 वर्षात असंख्य लोकाभिमुख योजना आणल्या. 2020 मध्ये सुरू केलेली "स्वामित्व योजना" ही त्यापैकीच एक अत्यंत यशस्वी योजना आहे. ही योजना म्हणजे ग्रामस्वराज्याचं मूर्तिमंत उदाहरण आहे. ग्रामीण भागातील गरिबांना आत्मनिर्भर करणारी मोहीम आहे. हे केवळ मालमत्तेचे कार्ड नाही तर त्यांचे "स्वाभिमान कार्ड" आहे. "माझी संपत्ती माझा अधिकार" असे सांगणारे हे कार्ड आहे.

गावांचे ड्रोनने सर्वेक्षण केले जाते तसेच जीआयएस तंत्रज्ञानाद्वारे ग्रामीण भागातील जमिनीचे सीमांकन होते. आत्तापर्यंत देशातल्या सव्वातीन लाख गावांमधून ड्रोन सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे 2.19 कोटी प्रॉपर्टी कार्डस् तयार करण्यात आले आहेत. यापूर्वी अनेक राज्यांमध्ये गावांच्या रहिवासी क्षेत्राचे नकाशे नव्हते. त्यामुळे बँकांकडून कर्ज मिळत नव्हते. या नव्या योजनेमुळे अनेक मालमत्ताधारकांना त्यांच्या प्रॉपर्टी कार्डच्या माध्यमातून बँकेचे कर्ज घेता येणार आहे,

प्रॉपर्टी नावावर असल्याने बँकेतून कर्ज घेणे सोपे होतंय. दुसऱ्या तिसऱ्याकडून जास्त व्याजाने पैसे घेण्याची आफत येत नाही. त्यामुळे कर्जबाजारीच्या दुष्टचक्रातून अनेक जण बाहेर पडले आहेत, याचा मला विश्वास आहे.

- या योजनेमुळे गरिबांना कुणापुढे हात पसरायला लागणार नाही. आत्मनिर्भर भारताचं जे स्वप्नं आहे ते अशाच योजनांच्या माध्यमातूनच साध्य होणार आहे.
- या योजनेमुळे ग्रामीण भागात आमूलाग्र बदल होत आहेत. गावठाणातील सीमा निश्चित होवू लागल्या आहेत.
- प्रत्येकाचे प्रॉपर्टी कार्ड तयार होतंय.
- सरकारचा महसूल वाढतोय.
- गावातील मालकी हक्काचे आणि हद्दीचे वाद कमी होत आहेत. ग्रामपंचायतीला ग्राम विकासाचे नियोजन करण्यामध्ये या प्रॉपर्टी कार्डचा उपयोग होतोय, त्यातून विकास योजना मार्गी लागत आहेत.
- या मोहिमेत ग्राम परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्य आहे. हे सामर्थ्य आपल्याला वाढवायचे आहे. गावांचे अन् इथल्या बळीराजाचेही सामर्थ्य वाढवायचे आहे.
- हे कार्ड म्हणजे फक्त कायदेशीर दस्तावेज नाही विकास आणि विश्वासाचा मंत्र आहे. त्यामुळे एक विशिष्ट डेडलाईन ठरवून टाईम बाऊण्ड पध्दतीने ही योजना राबविली, तर आपल्याला नियोजित लक्ष्य गाठता येईल.

स्वामित्त्व प्रॉपटी कार्ड हे त्यांच्यासाठी संजीवनी कार्ड ठरेल.



**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ॲड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

## आठवणींच्या गोष्टी



राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# वडिलांचां वारसा जपणारा शाहीर नंदेश उमप

'शुद्ध बिजा पोटी फळे रसाळ गोमटी ' आणि ' बाप तसा बेटा' ही म्हण सर्वश्रुत आहे. याचं म्हणीचा प्रत्येय गुरुवार दिनांक ९जानेवारी २०२५ रोजी चिपळूकरांनी शाहीर नंदेश उमप यांच्या कार्यक्रमातून घेतला, अनुभवला नंदेश दादानं असं काही सादरीकरण केलं की त्यातून अभिनय, गाणं, निवेदन याचा सुंदर संगम पाहावयास मिळाला . लोक या शाहिराने सादर केलेली गीते समारोपाला गायिलेला पोवाडा गुणगुणत घरी परतले. स्वतःच्या बायपास सर्जरीला सहा महिनेही पूर्ण झालेले नसताना केवळ गाण्यासाठी प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर स्टेज गाजवण काय असतं. रसिकांच्या आनंद नी समाधाना करीता कलाकार स्वतःला, आपल्या अडीअडचणी, शरीराच्या वेदना विसरुन समाजात कसा वावरतो त्याचं उदाहरण मला माहिती आहेत. त्यातील एक शाहीर नंदेश उमप स्वतः!



वयाच्या आठव्या वर्षापासून वडीलासमवेत गाणारा आणि ऐशीव्या वर्षीही रसिकासाठी नी रंगभूमीच्या सेवेकरीता स्टेजवर गाणाऱ्या, नाचणाऱ्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या पित्याचा म्हणजे लोकशाहीर विठ्ठल उमप यांचा वारसा नी संस्कार जपणारे त्यांच्या, नसानसात शब्दात आणि सादरीकरणात दिसले.

चिपळूण येथील वाशिष्ठी डेअरी आयोजित कृषी महोत्सवाच्या समारोपाच्या पाचव्या दिवशी रात्री सुरू झालेला लोकसंगीत नजराणा असलेला बहारदार कार्यक्रम मराठी विविधरंगी लोकसंगीत कार्यक्रम शाहीर नंदेश उमप आणि सहकाऱ्यांनी सादर केला. बरीच वर्ष समक्ष भेट नसल्याने, कार्यक्रम पाहण्या बरोबरच या शाहीर बंधूंना भेटण्यासाठी आवर्जून उपस्थित राहिलो. कार्यक्रमाआधी रंगपटात जावून प्रथम त्यांची आस्थेनं विचारपूस केली. दादा अशी आपुलकीची साद घालून या बंधून माझीही विचारपूस केली. दादा पूर्ण कार्यक्रम बघा नी भेटून जा म्हणाले. कार्यक्रमासाठी शुभेच्छा देऊन मी प्रेक्षकांमध्ये येऊन बसलो .

कार्यक्रम सुरु झाला. पठ्ठे बापूराव यांच्या" आधी गणाला रणी आणू या, नाहीतर रंग पुन्हा सुना सुना..." या गणाने कार्यक्रमाची सुरुवातआणि तिथूनच खरी रसिकांची दाद सुरू झाली. बहिणाबाई चौधरी यांच्या काही ओव्या रसिकांना ऐकवल्या. यात "माय म्हणता म्हणता ओट ओटाला भिडे, अन आत्या आत्या म्हणता केवढ अंतर पडे.." यामध्ये त्यांनी बहिणाबाईंच्या ओवीचा भावार्थ नी नात्यातील उबदार गोडवा रसिकांना साभिनय सांगितला.

ग्रामीण भागातली सकाळ "मला ग बाई जागा आली, कोंबड्याने बांग दिली सुपात जोंधळ घोळीते". हरिनामाच्या गजराने. " चंद्रभागेच्या तिरी उभा मंदिरी.. हा अभंग गात गात पुढे विठ्ठल नामाचा गजर करत "जय जय राम कृष्ण हरी" या नाम घोषाने रसिकांना भक्तीच्या सागरात आणि विठुरायाच्या नाम जयघोषात नाचाया , डोलायला भाग पाडले. यावेळी त्यांनी रसिकांमध्यें जावून ,नाचून ,गावून एकजीवपणा निर्माण केला.एवढा मोठा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा कलाकार पणं वडिलांची विनम्रता जपणारा जमिनीवर पाय असणं म्हणजे काय ते चिपळूणकरानी अनुभवले.

आपली संस्कृती लोककलेच्या आणि लोकसंगीताच्या माध्यमातून भावनावरती आरूढ होते ते भारुड. हा एक लोककलेतील प्रकार त्यांनी सादर करतानाच शाहीर विठ्ठल उमप यांनी गायलेले

**"फु बाई फु फुगडी फु**
**दमलास काय माझ्या गोविंदा तू"**

या गीतातून भारुड मनोरंजनातून प्रबोधन कसे करते ते दाखविले. यावेळी मला त्यांच्या आवाज नी सादरीकरणात साक्षात लोकशाहीर विठ्ठल उमप बाबाचं दिसले. कारण बाबांच्या तोंडून मुंबईत मी अनेकदा हे गीत साभिनय ऐकले आहे. त्यांचं जांभूळ आख्यान पाहिलं आहे

आदिवासी संस्कृती त्यांची बोलीभाषा यावरही कार्यक्रमांतून प्रकाश टाकला. भक्ती रसाबरोबरच राधा कृष्ण यांच्या प्रेमाचे वर्णन करणारी आणि भक्तीप्रेमाचा महिमा सांगणारी गौळण सादर केली. " यमुनेच्या तरी काल पाहिला हरी, कान्हा वाजवितो बासरी" या गवळण गीतावर नंदेश उमप यांनी लहानथोराना अक्षरशः नाचवले. स्वतः कृषी महोत्सवाचे आयोजक आणि वाशिष्ठी डेअरीचे अध्यक्ष प्रशांतजी यादवांसह उपस्थित मान्यवर नंदेशजीची कला पाहून दाद दिली. यांनीही कार्यक्रमात लावणी नृत्य सादर करण्यात आले. त्यानंतर दोन ढोलकी वादकांच्या जुगलबंदीने रसिक भारावून गेले. ढोलकीवाले राजा जामसंडेकर यांच्या मुलाने आपल्या वडिलांचा वारसा जपत त्यांनी विठ्ठल उमपाना जशी साथ दिली तशीच साथ नंदेशनां हा बंधू देतं आहे . गोंशीधळ, लगीन गीत, नृत्य यातून रसिकांचे मनोरंजन करताना शाहीर नंदेश उमप यांनी "प्रतापगडच्या पायथ्याशी खान" हा शिवरायांचा पोवाडा सादर केला. यावेळी त्यांनी तो रसिकांच्या डोळ्यासमोर उभा केला. आयोजक प्रशांत यादव , अँड स्वप्नाताई यादव त्यांचं कुटुंबीय आणि वाशिष्ठी परिवार तर्फ नंदेशजीचां कार्यक्रमाच्या मध्यंतरात सन्मान करण्यात आला. त्यांचे मनापासून कौतुक करत ,आभार व्यक्त केले. लोकसंगीताच्या या कार्यक्रमाला रसिकांनी शेवटपर्यंत दाद दिली.
शाहीर विठ्ठल उमप यांची छबी तुमच्यात दिसते "असे भावनिक उद्धगार मुख्य आयोजक प्रशांतजी यादव यांनी व्यक्त करताच नंदेश यांचे डोळे पाणावले. नंदेश तुम्हीं दिल्लीत सादर केलेला हिंदीतील पोवाडा सादर करा नंदेशदादांनी आयोजक यादवजी यांची इच्छा पूर्ण केलीचं आणि रसिकांना ज्याची आतुरता होती त्या प्रताप गडावरील छत्रपति शिवाजी महाराज यांचे शौर्य गाथा सांगणारा

रसिकांचे मनोरंजन करताना यांनी "प्रतापगडच्या पायथ्याशी खान" हा शिवरायांचा पोवाडा सादर केला. पोवाडा सादर केला. त्यांचा आवाज आणि सादरीकरणाला उपस्थित हजारो रसिकांची ,व्वा !व्वा! मिळाली .सारेच अवर्णनीय आणि अविस्मरिय असं होत.चिपळूणमध्यें कृषी महोत्सवा निमित्त पाचव्या दिवशी महोत्सवाचा समारोप कायमचं स्मरणात राहिलं. पणं प्रबळ इच्छाशक्ती कलेवरची निष्ठा असेल तर शरीराच्या वेदनाही आपल्या संवेदना जाणवू देतं नाही. शाहीर नंदेश उमप हे असं एक कलेतील रसायन आहे. त्यांची संपूर्ण टीम वाद्य, नृत्य गायक गायिका कलाकार बंधू भगिनी आणि आपल्या बंधुला साथ देणारा उद्देशदादा उमप यांनीही आपल्या गायकीची चुणूक चिपळूणच्या रसिकांना दाखविली.

समारोपानंर भेटून , मी नंदेशना "दादा चिपळूणकरांची मने जिंकलीत तब्बेतीची काळजी घ्या म्हणालो आणि घरी आलो. महाराष्ट्र शिरोमणी लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर प्रस्तुत "मी मराठी"सादरकर्ते शाहीर नंदेश उमप आणि कलाकार यांचं अभिनंदन आणि पुढील यशकरिता शुभेच्छा मंगल कामना व्यक्त करतो.

# अळवत

## मालवणी बोली



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

काल दोपारी परबीन धावत पळत आमच्याकडे येवन बसली. परबीन अशी धावपळीत इली की कायतरी खास कारण असतला ह्या जाणून माझ्या सासुबायन विचारल्यान, काय गे परबीनी, दरोज सांचे येणारी तू आणि आज अशी दोपारीच येवन बसलस? आईनु.... म्हणान परबीन थांबली. हडे तडे बघूक लागली. डोळे गरगरावूक लागली.

एक मोठोसो आवंढो गिळीत ती माझ्या सासुबायकडे बघीत म्हणाली, आईनु, तुम्ही कधी अळवत बघलास काय ओ? कधी अळवतीची सावट पडली काय ओ तुमच्यार? अळवतीचा नाव घेताच माझी सासुबाय चराकली. ती क्षणभर थरथरली. परत सावरून बसली आणि मग स्वत:क सावरीत म्हणाली, 'नाय गे बाय. मी नाय बघलय कधी अळवत. पण अशा अळवतीबद्दल जाणून आसय. माझो घोव अशे अळवतीचे लय गोष्टी सांगायचो. मी नाय कधी प्रत्यक्ष बघलय. पण माझी सासुबाय पण सांगायची, आपल्या आंबट्या आंब्याखाली, आसपास अळवतीचो संचार आसा.'
तशी परबीन म्हणाली, 'ओ, मी प्रत्यक्ष अळवत बघलय. काल रात्री. अळवतीकडे मी बघतय, अळवत माझ्याकडे बघता, असा चराकलय ना, काय सांगा!'

आता परबीन माझ्या सासुबायच्या बाजूकच खांबाक टेकान बसली. परबीनीन गजाल चालू केल्यान.
'त्येचा असा झाला, काल क्रिंक्रांत व्हती ना. किंक्रांत म्हणजे तिखटाणीचो सण. दिसभर कामा कधी संपतत?'
दोपारी जो तो आपापल्या कामावर म्हणान ह्ये म्हणाले, 'सांचेक म्हणजे रात्री क्रिंक्रांतीचो सण करूया. मस्त वडे सागुती करुया.' काल सांचेक ह्ये कामावरना सुटले ते थेट घराक इले. नायतर रोज कामावरना टायमात सुटले तरी ह्येच्याबरोबर चकाटे मार, त्येच्याबरोबर चकाटे मार असा करता करता घरात पाऊल पडासर सात वाजयतत. बरा बापया माणसाक सांगात तरी कोण? सांगात तेच्या तॉन्ड वाकडा. एकदा तॉन्ड घातल्यानी काय मग रातभर आमचो हुदुदो!

पण काल घराक इल्या इल्याच त्येनी घूडात हात घातल्यानी आणि चांगलो जुनाट कोंबो भायर काढल्यानी. कोंबो कापूचो म्हणजे ह्येंका भारी हौस. माका तर बाय कोंबो कापताना बघवतय नाय. अंगावर शिरशिरी येता. बापये बाय सटा सटा कोंबे कापतत. बापयांक काळीज असता की नाय कळना नाय. कोंबो बिंबो कापूचो असलो की आम्ही बाय किचनमध्ये जेवाण करनव नाय. वगीच वड्यांक नि मटणाक गॅस किती जाता! आताच्या दिसात गॅसचे दर किती वाढलेहत ते बघतास मा? पाठल्या दाराक भायर पडवीत आम्ही मस्त चूल केलीहा. माशे, मटाण, वडे असा काय असला की आम्ही थयसरच रांधताव. ह्येंनी कोंबो सुटी करून दिल्यानी. मी आपला वाटाण काढून मिक्सर लावक घेतलय. असो कधी मटाण, वडे सागुतीचो बेत असलो की मी बाय जेवणाक हात नाय घालनय. माझी सासुबाय सगळा जेवाण रांधता. तिच्या हातची चव काय सांगशात! जेवणारे भुरकान भुरकान जेवतत.

सांचे काळोख पडल्यावर सासूबायन पाठल्या दारची लायट लावल्यान. जेवणाचा सामानसुमान जवळ केल्यान. एका चुलीवर मटणाक फोडणी दिल्यान नि दुसऱ्या चुलीवर कढय ठेवन वडे तळूक बसली. थोड्याच वेळात मी आपली माझी कामा आटोपून पाठल्या दारच्या हुंबऱ्यावर सासुबाय सोबत गजाली करूक बसलय. मी आपला साठतय, सासूबाई कधी मटाण परतता, भात परतता, वडे तळताहा. थोड्याच वेळात मटणाचो नि वड्यांचो परिमळ पाठल्या दाराक परमाळाक लागलो. मटणाच्या वासान मांजरा म्याव



म्याव करूक लागली. मीया आपला सासुबाय बरोबर साठतय, साठतय. अचानक बोलता बोलता माझी नजर पाठल्या दारच्या मांडकुलच्या कलमाकडे गेली ना ओ मी अचानक चराकलय. माझ्या अंगावर सर्रकन काटो उभो ऱ्हवलो. बघतय तर काय, कलमाच्या मुळातल्या फांदयेर कोण तरी बाई बसलीहा. पांढरीधोप साडी, पांढरेधोप केस, गोरी गोमटी बाई फांदयेवर बसान आपली कधी सासुबाय कडे बघताहा, कधी माझ्याकडे बघताहा.

माच्या मी तिच्याकडे बघलय तशी ती माझ्याकडे बघूक लागली. मधीच मटणाच्या टोपाकडे, सुपातल्या वड्यांकडे बघूक लागली. मी अचानक आपला 'आईनु, ती बघा कोण...' ओराडलय.' तशी ती बाई फांदयेवरसून खाली उतारली नि तरातरा चलत पाठल्या दाराकडचो आकाडो वलांडून व्हाळयेच्या वाटेन नायशी झाली. मी भीयान चूर झालय. धावतच सासुबायकडे गेलंय. माझो आवाज ऐकून ह्ये, बाबा धावत पाठल्या दाराक इले.
'काय झाला गो? ओराडलस कशाक?', माका विचारूक लागले. मी तर भीतीन थरथरतय. त्येंका त्या बाईबद्दल सांगलय, तशे बाबा हसत म्हणाले, अगो भीया नको. अळवत आसा ती. लय पुर्वीपासून तिचो हयसर पाठल्या दाराक वावर आसा. ती कधी तसो कोणाक कसलो त्रास नाय देना. पण कधी मटणाचो, वड्यांचो दरवळ सुटलो की ती अशी वासाक प्रकट होता. कोणाक तरी दिसता. कोणाच्या तरी नजरेक पडता. तिका वडेसागुती लय आवाडता. मगे अशी कधीतरी नजरेक पडता. मग एका केळीच्या पानावर वडे सागुती वाढून ठेवायची. ती आपलो लागभाग गावलो की तृप्त होता, आपल्याक आशीर्वाद देता. लगेच बाबांनी केळीचा पान आणल्यांनी. शिजणाऱ्या टोपातलीच सागुती, भात, वडे वाढून ता पान कल मुळात ऱ्हेवन ठेवल्यानी. सासुबायन, मी पाठल्या दारचो सगळो पसारो आवरलव नि वळयत येवन जेवक बसलव. पण माझो लक्ष जेवणात लागता काय गे? माझ्या डोळ्यासमोरसून ती अळवत, तिचा चित्र काय हटला नाय. आता पण माझ्या डोळ्यासमोर तीच दिसताहा. पाठल्या दाराक जावची, दार उघडूची हिंमत होना नायहा. असा वाटता मी दार उघडतय नि समोर बघतय तर थयसर कलमाच्या मुळात ती पांढरी अळवत बसलीहा! अगे बाय! मी असा बोलत काय बसलय, आता पपो येयत शाळेत्सून. घरात मी नाय दिसलय तर घर डोक्यावर घेयत. त्येका इल्या इल्या चाय व्हयी. आज तर रातीचा उरलला मटाण नि वडे मागतलोहा. माका बाय जावदे. असा म्हणान परबीन उठान भायर पडली नि तिच्या घराकडे गेली. तितक्यात आमच्या पाठल्या दाराक कोंबड्यांची आरड पडली.

सासुबाय माका म्हणाली, 'जा गो. पाठला दार उघड. कोंबड्यांची आरड पडली कशाक ती बघ. कोलो बिलो येयत नि सोन्यासारो कोंबो न्हेत.
पण आता माका कापरो भरलोहा. पाठल्या दाराक जाव कसा, पाठला दार उघडू कसा? चुकान ती अळवत दिसली तर? दारातच उभी असली तर? माका बाय भीया वाटताहा. वायच तुम्ही जाशात काय ओ पाठल्या दाराक?'



## लसूणी चिकन कबाब रेसिपी



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**आज आपण लसूण चिकन कबाब ही एक चविष्ट डिश आहे जी स्नॅक्स किंवा स्टार्टर म्हणून खाल्ली जाते. लसूणाच्या मसालेदार चवीने परिपूर्ण अशा या कबाबची रेसिपी सोपी आहे. चला, घरी लसूण चिकन कबाब तयार करूया.**

**साहित्य :**

- बोनलेस चिकन: 500 ग्रॅम (मध्यम तुकडे)
- दही: ½ कप
- आलं-लसूण पेस्ट: 1 टेबलस्पून
- लसूण (किसलेला): 2 टेबलस्पून
- हिरवी मिरची पेस्ट: 1 टीस्पून
- जिरे पावडर: 1 टीस्पून
- धने पावडर: 1 टीस्पून
- हळद: ¼ टीस्पून
- लाल तिखट: 1 टीस्पून
- गरम मसाला: ½ टीस्पून
- कसूरी मेथी: 1 टीस्पून
- मीठ: चवीनुसार
- लिंबाचा रस: 1 टेबलस्पून
- मैदा: 2 टेबलस्पून
- कॉर्नफ्लोअर: 1 टेबलस्पून
- तेल: 1 टेबलस्पून (मॅरिनेशनसाठी)

**कृती:**

**चिकनचे तुकडे धुवून स्वच्छ पुसून घ्या आणि एका वाडग्यात ठेवा.**

1. **मॅरिनेशन तयार करणे:**
2. **एका मोठ्या वाडग्यात दही, आलं-लसूण पेस्ट, किसलेला लसूण, हिरवी मिरची पेस्ट, जिरे पावडर, धने पावडर, हळद, लाल तिखट, गरम मसाला, कसूरी मेथी, लिंबाचा रस, मैदा, कॉर्नफ्लोअर, तेल, आणि मीठ घालून व्यवस्थित एकत्र करा.**
3. **तयार मॅरिनेशनमध्ये चिकनचे तुकडे घालून चांगल्या प्रकारे मिक्स करा. सर्व तुकडे मसाल्याने व्यवस्थित झाकले गेले पाहिजेत. मिश्रण झाकून ठेवा आणि 2-3 तास फ्रीजमध्ये मॅरिनेट करा. वेळ असल्यास रात्रभर मॅरिनेट केले तर चव अधिक छान लागते.**
4. **एका खोलगट कढईत तेल गरम करा. तेल मध्यम आचेवर गरम झाले की मॅरिनेट केलेले चिकनचे तुकडे एकावेळी 4-5 टाका.**
5. **चिकनचे तुकडे मध्यम आचेवर सोनेरी तपकिरी होईपर्यंत आणि आतून शिजेपर्यंत तळा. तळलेले तुकडे पेपर नॅपकिनवर काढा, जेणेकरून जास्तीचे तेल निघून जाईल.**
6. **गरमागरम लसूण चिकन कबाब सर्व्हिंग प्लेटमध्ये ठेवा. त्यावर चिमूटभर कसूरी मेथी भुरभुरवा. सोबत चटणी, लिंबाचे तुकडे आणि कांद्याच्या रिंग्स ठेवा.**
7. **टीप:**
8. **तीव्र चव हवी असल्यास मिरचीचे प्रमाण वाढवा.**
9. **कबाब ओव्हनमध्ये बेक करूनही तयार करू शकता. 200 डिग्री सेल्सियसवर 20-25 मिनिटे बेक करा.**
10. **लसूण चिकन कबाबचा आनंद घ्या आणि आपल्या कुटुंबाला आणि मित्रांना खूश करा!**

## आठवणीतले व्यक्तीमत्व



श्री. धनंजय शेटये
गोळवण.

# भजन क्षेत्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक अनमोल हिरा कै. विश्वनाथ नाईक बुवा




सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यामधील सोनवडे तर्फे हवेली या गावातील भजन सम्राट कै. विश्वनाथ राघोजी नाईक बुवा चा जन्म ५/८/१९४४ साली कुडाळ मधील सोनवडेपार गाव मध्ये झाला. बुवांचे शिक्षण जिल्हा परिषद शाळेमध्ये झाले. लहानपणापासून गाण्याची आणि भजनाची आवड असणारे १९६४/६५ च्या दरम्यान मुंबईला कामानिमित्त आले आणि बुवा मंत्रालय पाटबंधारे विभागमध्ये कामाला राहिले. भजनाची आवड असल्यामुळे त्यांचे बाकी कशातही लक्ष लागत नव्हते. मग त्यांची परशुराम मौर्य बुवांशी ओळख झाली. विश्वनाथ बुवांना घेऊन गुरुवर्य गणेशनाथ यांच्याकडे शिकायला घेऊन गेले.

अतिशय आणि सुंदर पहाडी आवाज असणारे बुवा यांनी अगदी थोड्या दिवसातच डबलबारी मध्ये नावलौकिक मिळवण्याची सुरुवात केली. विश्वनाथ नाईकबुवा च्या डबलबाऱ्या भजन सम्राट परशुरामबुवा पांचाळ, भजनसम्राट विलासबुवा पाटील, भजन सम्राट काशीराम परब, भजनसम्राट लक्ष्मण गुरव, भजन सम्राट नानू मर्गज, भजन सम्राट ज्ञानदेव चव्हाण अशा बहुतेक साऱ्या नामवंत बुवा बरोबर खूप डबलबाऱ्या झाल्या. त्यांचा आवाज पहाडी होता. पेटी वाजवण्याची उत्तम कला होती. बुवांची गाजलेली गाणी सुद्धा अजून त्यांचे काही शिष्य गात असतात ( **नको माझ्या मना देवा माझ्या मना** )( **ऐका सासुबाई बोलू नका काही** )( **लावीत असे वेड काना मुरली तुझी गोड** )( **चंद्रपौर्णिमेचा** ) अशी कित्येक त्यांची गाजलेली गाणी आहेत.

त्यांची भजन ज्यांनी ज्यांनी पाहिली असतील त्यांना स्वत:ला आजही माहिती असेल की बुवांचा आवाज आणि हजरजबाबीपणा ! त्यांची गाणी ऐकून आजही कान तृप्त होतात. त्यांना पखवाज सात करणारे बाबी महाडेश्वर, लवू घाडी, अण्णा मार्गी, मोहन हिरलोकर ,संजय घोगळे अशा नामवंत भजनी कलावंतांनी संगीतसाज दिली. बुवांचे वडील दशावतारामध्ये काम करायचे. त्यांचे मोठे बंधू श्रीधर नाईक उत्कृष्ट संगीतकार. त्याकाळी अत्याधुनिक ध्वनिक्षेपक साऊंड सिस्टीम नव्हती तरी त्याकाळी बुवा काळी तीन मध्ये भजनाची सुरूवात करायचे. श्रोते मंत्रमुग्ध होऊन तल्लीन होऊन नाचायचे.

१९७० ते १९८० या दशकात डबलबारी साम्राज्याचा सम्राट म्हणून ख्यातनाम होते. सरकारी नोकरी सांभाळून आपली भजनकला जोपासली होती. चालू भजनात बसल्या बसल्या गाणे रचण्याची अलौकिक कला आत्मसात केलेले कोकणचं रत्न होते. अशा या भजन सम्राटाला मानाचा मुजरा.

# मंगल्याचो हळदी कुंकू

## मालवणी बोली



रीना पास्ते परब
पुणे

"गे वयनी... फाल्या हळदी कुंकू घालतलय गे... यवन जा वायच..." मंगला खळ्यातसून सांगान फुडे गेला. वयनीन 'ये मगो घरात' हुनाच्या आदी ता खायल्या खळ्यात पोचलादुकू... त्याका वाडियेतली इस येक घरा घेवन पा-स बायलमाणसांका फोन करूचो होतो. मंगला आंदार पडापडाक घरात इला. पायार पानी वतून मडक्यातला तामयोभर पानी घेवन ता वळयत इला. टेबल फॅन निसतो झिलाक वारो घाली होतो तो फिरतो करून ता भीतीक टेकान बसला. झिल टीवी बगीत अभ्यास करी होतो. मंगल्यान टीवीचो आवाज कमी करून झिलाकडसून फोन लावन घेतल्यान. झिलाक आदीच अभ्यास करूचो कंटाळो इल्लो त्याना आवशीक फोन लावन दिवन येळ घालयलो. मंगल्यान बाकी तयारी आदीच करून ठेयलली. काय तरी अडचण ययत तर हळदी कुंकू घालूचो रवता हुनत त्याना यवनू बेगीनच भागवचा यवजलला.

मंगला पानी खावन कोन रवला हेचो इचार करी होता. इचार करीतच ता उठान चुलीकडे गेला. भाताचो टोप उगडून बगल्यान तर वायच भात होतो. झिलाक भाकरी खातलस काय ईचारून त्याना चार भाकरीचा पिट डब्यातसून परातीत काढला. तवो तापत ठेवन पिट मळून घेतल्यान. तवो तापता हुनासर भाकरी थापटून घेतल्यान. पटापट भाकरी भाजून घेवन ता उठला.

"बाबू रे बाबू... हडे ये..." बाबूक साद घालीत त्याना पिठाचे हात धुले.

"काय गे आई...?" हुनत बाबू घरात इलो.

"बटाटी कापून वायच मीठ मसालो लावन तव्यार घालशीत... माका टरंकातले साडये बगूचे होते..." मंगला झिलाक कापा भाजुक सांगा होता. दोंपारचा सामारा भात आसलो तरी दुकू भाकरीच्या तोंडाक काय तरी व्हयाच... "भाजतय.." हुनत मंगल्याचो झिल बटाटी घेवन आडाळ्यार बसलो. बायलमानसाक लाजयत अशी पातळ कापा काढून त्याना ती धुवन घेतली. मीठ मसालो लावन वायच वगत मुरत ठेयली. तवसर तो आवस काय ढवळता ता बगूक होवरेत गेलो.

आवशीन लग्नापासूनचे साडये काडून पगाळो लायलली. मंगला येक येक साडी काडून काडून परत ठेय होता. हालीसालाक बरी साडीच घेवक नाय ह्या त्याच्या लक्षात इला. परस्तीती बरे बरे कपडे घेवची नसली तरी बायलमानसाक आशा ही असताच.

"कित्या व्हये साडये...? आसत तेच नेसाक घोपान नाय हा..." असा हुनत मंगल्यान आपल्याच मनाक शांत केल्यान. त्याना भाच्येच्या लग्नातली साडी बाजूक ठेवन बायकीचा सगळा होता तसा भरून ठेयल्यान. साडये वांगडा पोलको होतो तो जाता काय बगून त्याना तो दांडयेर ठेयलो. पोलको जाता ह्या गोष्टीन त्याका बरा वाटला.

मंगला होवरेतला आटपून चुलीकडे गेला. बगता तर झिल कापा भाजी होतो. मंगला यवन भायर बसला तितक्यात मंगल्याचो घो डुलत डुलत घरात इलो. मंगल्यान नजर टाकताच त्याका कळला आज गाडी फुल्ल हा. मंगला गप होता. तेचो घो यवन कपडे बदलून जवक घाल हुनाक लागलो. मंगल्यान जवक घातला. जवक बगून मंगल्याचो घो खुळावलो.

"माशे घेवक नाय काय गो..? सुक्या तरी भाजुक काय जाल्ला तुका...?" मंगल्याच्या घोवान बडबड करूक सुरवात केली. दारू खावन इलो काय त्याका बरा बरा खावक व्हया ता आज गावाक नाय तसो तो दनदनूक लागलो. मंगल्यान आयकान आयकान घेवन भांडाक सुरवात केली. दोगावचा जोरदार भांडान जाला. मंगल्याच्या घोवान मंगल्यार हात उचललो तसो झिल मदी इलो.




झिलाक बगून तो पाटी परातलो. जवच्या आदीच जावन निजलो. झिलान आवशीक लागी केल्यान. मंगल्याच्या डोळ्यात दुका होती. ता यवन चुलीकडे बसान रडाक लागला. झिलान पेल्यातसून पानी हाडून दिला. ता खावन मंगल्यान झिलाक जवक घातला. झिलान पयलो घास आवशीक भरयलो. मंगल्यान झिलावांगडा चार घास खाले. चुलीकडे आटपून दोगाय निजली. मंगल्याचो घो आदीच निजललो. मंगल्याक फाटेक जाग इली. बगता तर घो उठान पाटल्यादारा काय खुड खुड करी होतो.

मंगल्यान उठान त्वांड धुवच्या आदी हातीत खुटारो घेतलो. घराचे भवताली कचरो काडून ता घरात इला. बगता तर घोवान चायक आदान ठेवलल्यान. मंगला त्वांड धुवन न्हानयेत आग घाली होता. तवसर झिल उठान भायर इलो. बापाशीन झिलाक चाय व्हयी काय ईचारल्यान. झिलान उत्तर देवक नाय तसो बापुस आपली चाय घेवन लोट्यार यवन बसलो. मंगला भाकरी भाजुक बसला.

"बाबू रे... बाबू हडे ये. हयत्या पाटल्या पिश्येतलो सुको बांगडो काढ नि चुलीत घाल जा..." मंगल्यान पाटले पिश्येकडे बॉट दाखयत झिलाक बांगडो भाजुक सांगल्यान. मंगल्यान दोनच भाकरी भाजले. रातीचे भाकरी होते ते गरम केल्यान. ता उठान खोबरा कातूक बसला. चटनेक व्हया ता किसून भुतूर लोसून, आमटान, मिरची, मिट घालून वाटल्यान. भाकरी चटणी घेवन ता वळयत इला. झिलान खोल्यारसून बांगडो हाडल्यान. मंगल्याचो घो वयन नाश्टो करूक बसलो. दोन भाकरेंका धुकी लावन उठलो.

"मिया वयल्या सोनल्याच्या कामाक जातलय आज दोंपारा पावनेर हा आमका... जवक यवचय नाय..." मंगल्याचो घो पानी पिता पिता बॉला होतो.

पॉट भरल्यार त्याचा त्वांड उघडला. तसो तो बॉलाक लागलो. मंगला हु नाय का चू करीना. अर्दी भाकरी मोडून ता उठला. सगळा उकलून ठेवन ता आबोली काढूक भायर गेला. घसघशीत वळेसार जायत इतकी आबोली लागी करून हाडल्यान. ता यता हुनासर घो कामाक गेलो. घो जातूकशिनी त्याना सोमतो वळेसार गुतान पेडयेर ठेयल्यान. लगोलग पाटल्यादारा जावन शनाचो टब घेवन ता खळ्यात इला.

"बाबू दोन कळशे पानी हाडून वत रे..." आज आयतवार होतो. हुनान बाबू हातीक गावलो. बाबून आवशीक पानी वतून दिला. मंगल्यान शान वडून घेतल्यान. शनाच्या पायान ता भायरसूनच पाटल्यादारा यवन न्हावक पानी उसपान घेतल्यान. न्हावन यवन ता रानुक लागला. सांजे तग्यात व्हया ता रानुन ता मोकळा जाला. जवन जाला तसा ता हळदी कुंकवाचे तयारेक लागला.

पिंक्यांच्या फिरजातली फुला हाडून त्याना ताटात ठेयली. वाटयेत तिळगुळ काडून ठेयल्यानं. हळद कुंकू तांदूळ ताटात काडून खावची पाना ठेयल्यान. चार वाजाकशी लॉका यवक सुरवात जातली हुनत ता साडी गुटाळूक लागला. वाना वाटूक अगरबत्ती हाडलले ते पुडे त्याना परातीत यकार येक लावन त्याचार चार फुला सजयली. तीन साडेतीन वाजाक सगळी तयारी करून देवाक याक वान ठेवन पाया पडान तुळशिकडे वान ठेवक ता खळ्यात गेला. खळ्यात गेल्यार बुटा काडूची रवली ह्या त्याच्या ध्यानात इला. आदी त्याना तुळशीकडे बुटा काडली. मगे दारार काडली. आता कसा बरा वाटला हुनत त्याना तुळशीकडे पाट ठेवन वान ठेयला. मंगला घरात यवन बसला.

वायच वगतान आजूबाजूची सात-आट जना इली. पयलीच सात जना इली, तसा मंगला खुश जाला. हळूहळू बलयली सगळी यवक लागली. सांज जायसर मंगल्याचो हळदी कुंकू आटापलो. मंगला साडी बदलुक होवरेत गेला. झिल खडेसुन खेळान यवन भायर बसललो. तितक्यात मंगल्याचो घो इलो. मंगल्यान साडी बदलून यवन घोवाच्या हातीर तिळगुळ ठेयले. मंगल्याच्या घोवाच्या कालची गोष्ट मनाकडे इली.

"काल माजा चुकला गो... ह्या फुडे तुज्यार कदी हात उचलूचय नाय..." तो शरमेने मान खालते करून बॉला होतो.

"जाला ता जाला... आसाने, मिया चाय करून हाडतय..." मंगला चुलीकडे जाता जाता बॉलला.

"गो तिया दमल आसतल... मियाच करतय चाय..." हुनत मंगल्याचो घो त्याच्या पाठसून चुलीकडे गेलो.

आज दोगायनी मिळान चाय केली. झिल वळयत बसान पुस्तकात त्वांड घालून गालातल्या गालात हसाक लागलो...



# काव्यांगण

## थोडसं मोबाईल बद्दल...

मोबाईलच्या बॅटरीवर
नेटवर्क शिजवून खाता येत नाही
जीबी एमबीच्या नांगरानं शिवारं फुलत नाही

कितीही स्मार्ट झालो तरीही
भूकेला ब्लॉक करता येत नाही

फक्त गुगलवर नेवीगेट होऊन
मेंदू ग्लोबल कसा होईल ?

त्यासाठी अजून
अॅडव्हान्स व्हायला हवं
कास्ट अॅप परमनंटली
डिअॅक्टीवेट करायला हवं

नजरेलाही धर्माचा
एन्टीव्हायरस बसवू या का?
अन् वाणीला तो समतेचा
युनिकोड शिकवूया का?

फोन सोबतच आता
थोडीशी माणूसकीही
स्मार्ट करायला हवी..
तरच बहुतेक सुखी होईल
डिजीटल नवी पिढी....

व्हाट्सअप फ्रेंन्ड्स????

**सुदेश मालवणकर**
**दापोली**




## गोडवा तिळगुळाचा.

गोडवा तिळगुळाचा
असावा जीवनात
विषय जिव्हाळ्याचा
मुरावा अंतरंगात!!१!!

अंतरंग असावे निखळ
जसे तीळ गुळात विलीन
वहावा सत्याचा झरा अवखळ
त्यात स्थित विश्वास समर्पण!!२!!

तिळाने दिली ऊब भारी
गुळाची आली मधुर खुमारी
हिवाळ्यातील आरोग्य भारी
लज्जत भासे मनसोक्त भारी!!३!!

अशी संक्रांतीची मजा भारी
सयांनी केली खरंच साजरी
कृतीच वाटली ती प्यारी
मनात हळूच खोलवर रुजली!!४!!

**सुखदा सयाजीराव गोरड.**

## तीळगूळ

तीळगूळ द्यावा घ्यावा
गोड बोलावे सर्वांशी
चार दिसांचे पाहुणे
चार दिसांचे प्रवाशी

लाडू तीळाचा केवढा
नाही आकाराला मोल
मोठी भावना तयात
मोठे भावनेला मोल

तंटे बखेडे कशाला
स्नेहबंध तुटताती
प्रेम देऊनी बांधूया
स्नेहभावनेच्या गाठी

एक तीळ तीळ वाटू
प्रेम तीळाने वाढवू
सर्वे गुळाचा गोडवा
उभ्या जगताला दावू

सण येती सण जाती
बोध देऊनीया जाती
चला जपूया माणसे
चला जपू नाती गोती

**बाबू घाडीगांवकर**

# स्वयंपाकघरासाठी वास्तुशास्त्र टिप्स

**स्वयंपाकघर (किचन) हे घरातील महत्त्वाचे स्थान आहे कारण तेच आरोग्य, समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जा वाढवण्याचे केंद्र मानले जाते. स्वयंपाकघर योग्य दिशेला आणि योग्य पद्धतीने ठेवले असता त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. येथे स्वयंपाकघरासाठी काही महत्त्वाच्या वास्तुशास्त्र टिप्स दिल्या आहेत:**

**स्वयंपाकघराची दिशा**
- स्वयंपाकघर घराच्या आग्नेय (Southeast) कोपऱ्यात असावे. ही दिशा अग्नी तत्वाशी संबंधित आहे आणि स्वयंपाकघरासाठी सर्वांत योग्य मानली जाते.
- आग्नेय दिशा शक्य नसल्यास उत्तर-पश्चिम (Northwest) दिशेस स्वयंपाकघर ठेवले जाऊ शकते.

**२. चूल आणि पाण्याची जागा**
- स्वयंपाकघरातील गॅस शेगडी (चूल) आग्नेय दिशेला ठेवावी आणि स्वयंपाक करताना तोंड पूर्व दिशेला असावे.
- पाण्याचे नळ, सिंक, आणि पाण्याचा टँक उत्तर किंवा उत्तर-पूर्व (Northeast) दिशेला असावेत, जेणेकरून अग्नी आणि पाण्याचे संतुलन टिकून राहील.
- चूल आणि पाण्याचे नळ एकमेकांच्या शेजारी किंवा समोर नसावेत; यामुळे नकारात्मक ऊर्जा निर्माण होऊ शकते.

**३. स्टोरेज आणि कपाटे**
- स्वयंपाकघरातील धान्य, मसाले आणि भांडी ठेवण्यासाठी पश्चिम किंवा दक्षिण भिंतीला लागून कपाटे बनवावीत.
- भांडी आणि धान्य नीटसपणे ठेवावे, त्यामुळे स्वच्छता आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

**४. खिडक्या आणि वायुवीजन**
- स्वयंपाकघरात नैसर्गिक प्रकाश आणि वायुवीजन असावे. खिडक्या पूर्व किंवा उत्तर दिशेला असाव्यात.
- धूर निघण्यासाठी चिमणी (exhaust fan) किंवा वायुवीजन यंत्रणा आवश्यक आहे.

**५. रंगसंगती**
- **स्व**यंपाकघरासाठी हलके रंग (उदा. पांढरा, पिवळा, हलका हिरवा) निवडावेत. हे रंग सकारात्मकता आणि आनंद वाढवतात.
- काळा किंवा गडद रंग स्वयंपाकघरासाठी टाळावा.

**६. स्वच्छता आणि व्यवस्थापन**
- स्वयंपाकघर नेहमी स्वच्छ, नीटनेटके आणि अनावश्यक वस्तूंविना असावे.
- तुटलेली भांडी, मोडलेले उपकरणे स्वयंपाकघरात ठेवू नयेत; त्याने नकारात्मक ऊर्जा तयार होते.

**७. स्वयंपाकघरातील पूजा स्थळ**
- स्वयंपाकघरात देवघर ठेवू नये. ते स्वतंत्र जागी असावे.
- देवाचे फोटो किंवा मूर्ती उत्तर-पूर्व दिशेला असाव्यात.

**८. कचरापेटीची जागा**
- स्वयंपाकघरातील कचरापेटी दक्षिण-पश्चिम (Southwest) किंवा पश्चिम दिशेला ठेवावी. ती साफसफाई करून नियमित रिकामी करावी.

**९. ताजे अन्न आणि पाणी**
- स्वयंपाकघरात ताजे अन्न आणि स्वच्छ पाणी उपलब्ध ठेवावे. जुने किंवा खराब अन्न टाळावे.

**१०. स्वयंपाक करताना मनःस्थिती**
- स्वयंपाक करताना सकारात्मक विचार ठेवा आणि आनंदी राहा. याचा अन्नाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो.

**स्वयंपाकघराला योग्य प्रकारे व्यवस्थापित केल्यास कुटुंबातील आरोग्य, आनंद, आणि समृद्धी वाढते. त्यामुळे वास्तुशास्त्राचे हे सोपे नियम अंगीकारा आणि सकारात्मक परिणाम अनुभवा.**

# बाल जगत



## पतंगाचा आनंदमय प्रवास

मकरसंक्रांतीचा सण आला, आणि सोबतच नवे उत्साह, नवे रंग, आणि गोडतेने भरलेला आनंदही! छोट्या सायलीला या सणाचा खूप उत्सुकता होती. कारण तिच्यासाठी मकरसंक्रांती म्हणजे गुळपोळ्या, काळ्या-सोन्या वस्त्रांचे लेणे, आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पतंग उडवण्याचा आनंद. सायलीने आपल्या आईला विचारले, “आई, मकरसंक्रांती का साजरी करतात?”

आईने तिला हसून सांगितले, “मकरसंक्रांतीला सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. या दिवसापासून दिवस मोठे होऊ लागतात आणि नव्या ऊर्जेचा आरंभ होतो. म्हणूनच आपण या दिवसाला गोड बनवतो आणि सगळ्यांना आनंद देतो.”

सायलीला हे ऐकून खूप काही शिकायला मिळाले. दुसऱ्या दिवशी ती आपल्या बाबा आणि मोठ्या भावासोबत पतंग उडवायला गच्चीवर गेली. बाबांनी एक मोठा, रंगीबेरंगी पतंग आ ला होता, ज्यावर सूर्याचं छान चित्र होतं. सायलीनेही आपला लहानसा निळ्या रंगाचा पतंग तयार ठेवला होता.

गच्चीवर पोहोचल्यावर वातावरणात एक वेगळाच उत्साह होता. सगळीकडे फक्त पतंगच पतंग दिसत होते—लाल, पिवळा, हिरवा, आणि अगदी चित्तथरारक रंगसंगतीचे! सायलीचा भाऊ विवेक पतंग उडवण्यात माहीर होता. त्याने आपला पतंग हवेत सोडला आणि तो लांबपर्यंत उंच गेला. सायलीनेदेखील प्रयत्न केला, पण तिचा पतंग जमिनीवरच अडकून राहिला.

सायली थोडी निराश झाली. तिला वाटलं, “मी कधीच पतंग उडवू शकणार नाही.” पण बाबा तिच्याजवळ आले आणि म्हणाले, “सायली, प्रयत्न करत राहिलीस तर नक्की यशस्वी होशील. चला, एकत्र प्रयत्न करूया.”

बाबांच्या मदतीने सायलीने पुन्हा प्रयत्न केला. यावेळी तिने पतंगाला हळूहळू आकाशात सोडायला सुरुवात केली. आणि आश्चर्य म्हणजे, पतंग आता हवेच्या लहरींवर नाचू लागला! सायली खूप आनंदी झाली. तिला वाटलं जणू तीच त्या पतंगासोबत आकाशात उडत आहे. त्याचवेळी गच्चीवरून तिच्या मित्राने हाक मारली, “सायली, तुझा पतंग खूप छान आहे!”

सायलीने आनंदाने प्रतिसाद दिला, “हो ना! आज मी पहिल्यांदाच स्वतःचा पतंग उडवला आहे.” सायलीच्या पतंगाने लवकरच इतर पतंगांना मागे टाकायला सुरुवात केली. तिचा विश्वास वाढला आणि तिला नवे खेळ शिकायला आवडले. दिवसभर गोड गाणी गात, पतंग उडवत, आणि गोड गूळपोळी खाल्ल्यानंतर सायलीला खूप समाधान वाटलं. सायलीने त्या दिवशी एक मोठा धडा शिकला—“जिथे प्रामाणिक प्रयत्न आणि आत्मविश्वास असेल, तिथे यश नक्कीच मिळतं.”

त्या रात्री ती झोपताना विचार करत होती, “माझ्या पतंगासारखंच आयुष्यातही उंच भरारी घेण्यासाठी प्रयत्नांची आणि धैर्याची गरज आहे.”

त्या दिवशीचा मकरसंक्रांतीचा सण सायलीसाठी केवळ सण न राहता एक जीवनाचा मोठा धडा ठरला.

**प्रयत्न, धैर्य, आणि आत्मविश्वासाने कोणतीही गोष्ट साध्य करता येते, आणि सण हे फक्त गोडधोड करण्यासाठीच नाहीत, तर आपल्याला शिकवण देण्यासाठीही असतात.**



## तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला!

आपण दर वर्षी मकरसंक्रांत हा सण साजरा करतो. मला हा सण खूप आवडतो. आम्हाला त्या दिवशी शाळेला सुट्टी असते. आम्ही कागदाचे पतंग बनवून दूर आकाशात उडवतो. त्या दिवशी आम्ही एकत्र मिळून पतंग उडवतो. सर्वांना मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा देतो. आणि त्या सोबत बोलतो की तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला. आणि तिळगूळ दिल्यावर सर्वांना शुभेच्छा देतो. आम्ही दरवर्षी मकरसंक्रांतीची मजा घेत असतो. या सणाला आम्हाला पतंग उडवायला खूप मजा येते. सर्व लोक या मकरसंक्रांतीची मजा घेत असतात. एकमेकांना तिळगूळ खायला देतात. पण दरवर्षी पेक्षा मला यंदाच्या वर्षी मकरसंक्रांतीत पतंग उडवायला खूप मजा आली. तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला म्हणजे एक तिळगूळाचा लाडू असतो. तो देतात आणि समोरच्या व्यक्तीला सांगतात की गोड गोड बोला. आमचे सर आम्हाला सांगतात की थंडीतून तिळगूळ खायला हवे. मला तर तिळगूळ खायला खूप आवडतात. ते खूप मस्त लागतात. तिळगूळ तिळ, शेंगदाणे व गुळ यांपासून बनवलेले असतात. मला या वर्षी मकरसंक्रांतीत खूप मजा आली.

**कु. प्रसाद शिगवण,**
**शाळा- चंद्रनगर**





